POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-११९ ● मुंबई, सोमवार, ०१ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### या राज्यांना रेड अलर्ट

दरम्यान या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि आंध्र प्रदेशमध्ये रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. या चक्रीवादळाचा फटका हा तेलंगणाला देखील बसण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या किनारी भागपासून पन्नास ते साठ किलोमीटर दूर अंतरावरून जाणार असल्यामुळे पुढील दोन दिवस या भागामध्ये अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे, या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## प्रती तास ९० किमी वेगानं येतय मोठं संकट
# या राज्यांना रेड अलर्ट, पुढील ४८ तास अतिधोक्याचे

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या डिटवाह चक्रीवादळानं श्रीलंकेमध्ये धुमाकूळ घातला आहे. श्रीलंकेमध्ये अतिमुसळधार पाऊस सुरू असून, या चक्रीवादळाचा मोठा तडाखा बसला आहे. आतापर्यंत समोर आलेल्या माहितीनुसार श्रीलंकेमध्ये १२३ लोकांचा मृत्यू झाला असून, १३० लोक बेपत्ता आहेत. या चक्रीवादळामुळे मोठं नुकसान झालं आहे. दरम्यान आता हे चक्रीवादळ भारतीय किनारी प्रदेशाच्या दिशेन पुढे सरकलं आहे. भारतीय हवामान विभागाचे महानिदेशक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी एका वृत्तवाहीनीला दिलेल्या माहितीनुसार हे चक्रीवादळ शनिवारी रात्री तामिळनाडूच्या किनारी भागामध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ मध्यरात्रीपर्यंत तामिळनाडूच्या किनारी भागांपासून ६० ते ७० किलोमीटर अंतरावर असण्याचा अंदाज आहे. तर रविवारी सकाळी हे चक्रीवादळ पुद्दुचेरीच्या किनारी भागांपर्यंत पोहोचणार आहे. आयएमडीकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार भारतामध्ये देखील चक्रीवादळ डिटवाहची तीव्रता कायम राहण्याची शक्यता आहे. या चक्रीवादळामुळे तामिळनाडू आणि पुद्दुचेरीच्या आसपास वादळाची गती ही ७० ते ८० किमी इतकी राहण्याची शक्यता आहे, तर आंध्र प्रदेशच्या किनारी भागात वाऱ्याचा वेग ताशी ५० ते ६० किमी इतका राहण्याचा अंदाज आहे. पुढील दोन दिवस हवेचा वेग वाढून तो प्रती तास ९० किमीवर देखील पोहोचू शकतो. या काळात समुद्रात ८ मीट पर्यंत उंच लाटा उसळण्याची शक्यता असून, या पार्श्वभूमीवर मच्छिमार बांधवांना समुद्रात न जाण्याचा आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आलं आहे.

दरम्यान महाराष्ट्रात संदर्भात देखील मोठी बातमी समोर आली आहे, ती म्हणजे महाराष्ट्रात सुद्धा काही भागांमध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. कोकणात ढगाळ वातावरण राहणार असून, वाऱ्याचा वेग वाढणार आहे. या पार्श्वभूमीवर सतर्कतेचं आवाहन करण्यात आलं आहे, थंडी देखील काही प्रमाणात कमी होऊ शकते.




### अतिमुसळधार पावसाचा इशारा, हाय अलर्ट जारी

या वर्षी देशासह राज्यात पावसानं धुमाकूळ घातल्याचं पहायला मिळालं. यंदा देशभरात सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला. या पावसाचा मोठा फटका हा अनेक राज्यांना बसला. पावसामुळे मोठं नुकसान झालं. महाराष्ट्रालाही यावर्षी मान्सूनचा चांगलाच तडाखा बसला. महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर आला. नद्यांना आलेल्या पुरामुळे ग्रामीण भागामध्ये मोठं नुकसान झालं. अनेक ठिकाणी घरं वाहून गेल्यानं अनेकांचा संसार उघड्यावर आला तसेच पिकांची देखील मोठ्या प्रमाणात नासाडी झाली. पावसामुळे खरीप हंगाम हातचा गेला. दरम्यान आता अनेक राज्यांमध्ये हळुहळु थंडीचा कडाका वाढू लागला आहे, मात्र थंडीचा कडाका वाढत असतानाच आता मोठी बातमी समोर आली आहे ती म्हणजे पुन्हा एकदा अनेक राज्यांमध्ये आयएमडीकडून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा हाय अलर्ट देण्यात आला आहे. डिटवाह चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर हवामान विभागाकडून पावसाचा अलर्ट जारी करण्यात आला आहे.

## मुंबईतील एअर क्वालिटी सेन्सर्स बंद
# बांधकाम परिसरात मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य कारभार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील वायू प्रदूषणाची पातळी दिवसेंदिवस खराब होत असताना, शहरातील बांधकाम परिसरात मोठ्या प्रमाणावर नियमबाह्य कारभार होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या पथकाने केलेल्या तपासणीत १००० हून अधिक बांधकाम प्रकल्पांवर वायू प्रदूषण मोजणारे सेन्सर्स पूर्णपणे बंद असल्याचे उघड झाले असल्याचा आरोप मुंबई महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते रवीराजा यांनी केला आहे.

मुंबई महापालिकेच्या नियमांनुसार ज्या परिसरात बांधकाम सुरू आहे, त्याठिकाणी अदक मॉनिटरिंग सेन्सर्स कार्यरत असणे बंधनकारक आहे. मात्र अनेक बांधकाम ठिकाणी हे सेन्सर्स बसवण्यात आलेले नाहीत किंवा ज्या ठिकाणी आहे ते बंद आहेत.



या दरम्यान नियम मोडनाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवर थेट दंडात्मक कारवाई करण्याऐवजी महापालिकेकडून केवळ इशारे देण्यात येत असल्याचा आरोप रविराजा यांनी केला आहे. तसेच प्रदूषणामुळे मुंबईची हवा 'अत्यंत खराब' श्रेणीत पोहोचत असताना, पालिका कारवाईबाबत गंभीर नसल्याने नागरिकांकडून तीव्र नाराजी व्यक्त केले जात असल्याचा आरोप रवीराजा यांनी केला.

आरोग्य तज्ञांच्या मते, पीएम२.५ आणि पीएम१० च्या वाढलेल्या पातळीमुळे दमा, खोकला, श्वास घेण्यातील त्रास अशा आजारांचे प्रमाण शहरात झपाट्याने वाढले आहे. बांधकाम परिसरातील धूळ नियंत्रणाची उपाययोजना योग्य नसेल तर प्रदूषण थेट वाढते, असे तज्ञांचे स्पष्ट मत असल्याचे रवी राजा यांनी सांगितले.

कायद्यानुसार महापालिकेला सेन्सर न बसवणाऱ्या किंवा बंद ठेवणाऱ्या प्रकल्पांवर त्वरित दंड ठोठावणे, नोटीस देऊन काम थांबवणे, धूळ नियंत्रण प्रणाली बंधनकारकपणे सुरू ठेवण्याची सक्ती असे अधिकार आहेत. मात्र प्रत्यक्ष कारवाई न करता केवळ इशारे देण्यात येत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. परिणामी, मुंबईकर आरोग्य धोक्यात आले आहेत, त्यामुळे ज्या बांधकाम व्यावसायिकडून नियमांचे उल्लंघन होत असताना महापालिकेने तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी रवीराजा यांनी केली आहे. तसेच या प्रकरणी आयुक्तांनी स्वतः लक्ष घालण्याची गरज असल्याचे मत रवीराजा यांनी व्यक्त केले.

## राज्यातील २० नगरपालिकांमध्ये निवडणुका पुढे ढकलल्या, प्रभागात कार्यकत्यार्चा हिरमोड

**■मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठींच्या मतदानाच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. दुसऱ्या दिवशीच म्हणजे ३ डिसेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. ४ नोव्हेंबरपासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. अशातच राज्यात ज्या ज्या ठिकाणी नगरपरिषदाच्या अध्यक्षपदावरून आक्षेप आहे त्या ठिकाणी सर्वच निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. पुणे जिल्ह्यातील बारामती तालुक्यासह हिल्यानगर जिल्ह्यातील १२ पैकी ४ नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगानं दिली आहे.

पुण्याच्या बारामती नगरपरिषदेसाठी नगराध्यक्ष आणि नगरसेवकांसाठी दोन डिसेंबर रोजी होणारी मतदान प्रक्रिया तात्पूर्ती स्थगित करण्यात आली आहे. नगराध्यक्ष पदा सह नगरसेवक पदांसाठीचा निवडणूक कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला असून नवीन कार्यक्रमानुसार बारामती नगरपरिषदेसाठी २० डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर २१ डिसेंबर रोजी मतमोजणी पार




पडणार आहे.

बारामती नगरपरिषदेच्या विरोधात उमेदवारांच्या संदर्भात न्यायालयाचा अपील दाखल झाले होते, याशिवाय प्रभाग क्रमांक प्रभाग क्रमांक १३ (ब) व प्रभाग क्रमांक १७ (अ) या दोन प्रभागांतील निवडणुका अगोदरच तात्पुरत्या स्थगित करण्यात आल्या होत्या. निवडणूक जाहीर झाल्यानंतर आणि अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख संपल्यानंतर या दोन जागांसाठी न्यायालयाच्या आदेशानुसार २६ नोव्हेंबर रोजी नव्याने दोन उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. भाजपचे नेते सतीश फाळके व अविनाश गायकवाड यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर बारामती न्यायालयाने या दोघांचेही उमेदवारी अर्ज दाखल करून घेण्याचे आदेश निवडणूक आयोगाला दिले होते.

एकंदरीतच या दोन जागा याशिवाय इतर जागा संदर्भात न्यायालयात दाखल झालेले अपील याचा विचार करता केलेल्या अपिलाची मुदत संपल्यानंतर निवडणुक कार्यक्रम लागणे आवश्यक आहे असं निवडणूक आयोगाचे म्हणणं आहे आणि त्यानुसार २ डिसेंबर रोजी होणारी बारामती नगर परिषदेसाठी नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाची ही निवडणूक प्रक्रिया सध्या स्थगित करण्यात आली आहे आणि नवीन अध्यादेशानुसार ही मतदान प्रक्रिया आता २० डिसेंबर रोजी होणार आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ पैकी ४ नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलल्या आहेत. कोपरगाव, देवळाली, नेवासा व पाथर्डी या चार ठिकाणी नगराध्यक्षपदाच्या उमेदवाराबद्दल कोर्टात अपील असल्याने नगरपरिषद निवडणूक पुढे ढकलली आहे. याबरोबरच सात नगरसेवक पदाच्या उमेदवाराबाबत कोर्टात आपली असल्याने त्या ठिकाणी देखील मतदान प्रक्रिया देखील पुढे ढकलणार. पुढे ढकललेल्या नगरपरिषद आणि नगरसेवक पदाच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये १० डिसेंबर पर्यंत माघार घेण्यासाठी मुदत तर २० डिसेंबर मतदान आणि २१ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार असल्याची माहिती आहे.



# तब्बल ३० तास पाणीपुरवठा राहणार बंद : बीएमसी

### ३० तास पाणीपुरवठा बंद

पाइपलाइनच्या कामामुळे शहरातील मोठ्या भागात ३० तास पाणीपुरवठा पूर्णतः बंद किंवा कमी दाबाने होणार आहे. ही जलवाहिनी बंदी सोमवार, १ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता सुरू होऊन मंगळवार, २ डिसेंबर रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत चालणार आहे. घाटकोपर पूर्व येथील छेडा नगर जंक्शनवर २,५०० मिमी व्यासाच्या नव्या जलवाहिनीला ३,००० मिमीच्या विद्यमान मुख्य जलवाहिनीशी जोडण्याचे काम या काळात केले जाईल. अमर महल टनेलमधील शाफ्ट क्रमांक १ आणि २ मुख्य जलवाहिनी जाळ्याशी जोडण्यासाठी हे काम अत्यंत आवश्यक असल्याचे बीएमसीने स्पष्ट केले आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेने पाइपलाइन क्रॉस-कनेक्शनचे काम हाती घेतल्याने पुढील आठवड्यात मुंबईत पाणीपुरवठा बंद राहणार आहे. अमर महल भूमिगत बोगद्याच्या संबंधित महत्त्वाचे काम असल्याने पाणीपुरवठा खंडित केला जाईल. याच पार्श्वभूमीवर, बीएमसीने नागरिकांना पाण्याची काटकसर करण्याचे आवाहन केले आहे.

**अकरा प्रशासकीय वॉर्डमध्ये पाणी कपात**

दक्षिण आणि मध्य मुंबईतील ए, बी, सी, ई, एफ दक्षिण आणि एफ उत्तर वॉर्ड तसेच पूर्व उपनगरांतील एल, एम पूर्व, एम पश्चिम, एस आणि एन वॉर्डला या पाणीकपातीचा फटका बसणार आहे. भायखळा, मुंबई सेंट्रल, नागपाडा, डोंगरी, मस्जिद बंदर, वरळी, परळ, सायन, वडाळा आणि शिवडी येथे राहणाऱ्या नागरिकांनी पुरेसा पाणी साठा करून ठेवण्याचे आवाहन बीएमसीने केले आहे.

**पूर्व उपनगरांनाही फटका**

पूर्व उपनगरांतील कुर्ला, चेंबूर, चूनाभट्टी, गोवंडी, देवनार, घाटकोपर, विक्रोळी आणि भांडुप येथील काही भागातही पाणीपुरवठा बंद किंवा कमी दाबाने होणार आहे.

**पाणी जपून वापरा- बीएमसीचे आवाहन**

नागरिकांनी पाणीपुरवठा बंद राहिलेल्या तासांमध्ये पाणी वापरात काटकसर करावी, असे आवाहन बीएमसीने केले आहे. "पाईपलाइनचे नवे कनेक्शन शहराच्या दीर्घकालीन जलपुरवठा व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी अत्यावश्यक असल्याने हे काम पुढे ढकलणे शक्य नाही," असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. नागरिकांनी संबंधित वॉर्डनिहाय प्रसिद्धपत्रक तपासावे आणि दोन दिवस चालणाऱ्या देखभाल कामासाठी योग्य तयारी करावी, असेही आवाहन बीएमसीने केले आहे.

## धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या अडचणीत वाढ
### थेट महापालिकेनं बजावली नोटीस, काय म्हटलंय त्यात?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या कार्यस्थळी प्रदूषण नियंत्रणाचे नियम पाळले जात नसल्याच्या तक्रारी आल्यानंतर बीएमसी (जी-उत्तर विभाग) ने कठोर पाऊल उचललं आहे. मुंबई महानगरपालिकेने उपजिल्हाधिकारी आणि डीआरपी च्या सक्षम प्राधिकरणाकडे विकासकाची प्रकल्पासाठी दिलेली परवानगी रद्द करण्याची आणि योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली आहे. माटुंगा लेबर कॅम्प परिसरातील एका कार्यस्थळाची पाहणी केली असता अँटी-स्मॉग गन, ग्रीन नेट, टायर धुण्याची सुविधा आणि प्रदूषण मॉनिटर डिस्प्ले बोर्ड यांसारख्या आवश्यक मार्गदर्शक तत्त्वांचं उल्लंघन झाल्याचं स्पष्ट झालं आहे. मुंबईत वाढत असलेल्या वायू प्रदूषणाला रोखण्यासाठी मनपाच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. महानगरपालिकेकडून मिस्ट कॅननद्वारे मुंबईमध्ये ठिकठिकाणी फवारणी करण्यात येत आहे. मुंबईतील वांद्रे इथल्या मातोश्री बंगल्याच्या परिसरामध्ये मिस्ट कॅननच्या माध्यमातून हवेतील धूळीकणांवर फवारणी करण्यात आली. रस्त्याच्या कडेला असलेली धूळ जमिनीवरच दाबण्याचा प्रयत्न महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे. एकीकडे मुंबई काँग्रेसकडून हवेच्या गुणवत्ता निर्देशांकासाठी आक्रमक भूमिका घेतली जात असताना महानगरपालिकेकडून डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## रडत-रडत मदत मागत होते पण...
### सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरला भररस्त्यात छेडलं, पोलीस हेल्पलाईनचाही प्रतिसाद 'शून्य'

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईच्या गोरेगाव परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. २३ वर्षीय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर तरुणीची एका अज्ञात व्यक्तीने छेड काढली. या तरुणीने स्वतः सोशल मीडियावर पोस्ट करून संपूर्ण घटना सांगितली. "मदतीसाठी ओरडूनही कोणीच पुढे आले नाही आणि पोलिस हेल्पलाईनवरही संपर्क झाला नाही", असा गंभीर आरोप तिने केला आहे.

**नेमकं काय घडलं?**

तरुणीच्या म्हणण्यानुसार, २६ नोव्हेंबर रोजी रात्री ९:४३ वाजता ही घटना गोरेगाव (पश्चिम) येथील रॅडिसन हॉटेलजवळील पुलावर घडली. ती फोनवर बोलत चालत होती. तेव्हा अचानक एक पुरुष मागून आला आणि त्याने तिची छेड काढली. यामुळे तिने घाबरून आरडाओरड केली. तेव्हा त्या अज्ञात व्यक्तीने आपल्या गाडीत बसून पळ काढला. ती तरुणी त्याच्या मागे धावत गेली, पण रस्त्यावरच्या वाहनांच्या गदीर्मुळे तो तरुण तिला दिसला नाही. तिने सांगितलं की, "मी रस्त्याच्या मधोमध उभी होते. रडत-रडत मदत मागत होते, पण कोणीही थांबलं नाही."

या घटनेची माहिती या तरुणीने तिच्या सोशल मीडियाद्वारे दिली. त्यात तिने म्हटले, "मी रात्री काही किरकोळ कामांसाठी बाहेर पडली होती आणि अंगभर कपडे घातले होते. तरीसुद्धा अशा घटना घडतात आणि नंतर महिलेलाच दोष दिला जातो."

**पोलिसांकडून प्रतिसाद नाही**

या घटनेनंतर तरुणीने तत्काळ मदतीसाठी प्रयत्न केला. मात्र, तिने केलेल्या दाव्यानुसार, १०० नंबर, महिला सुरक्षा हेल्पलाईन आणि इमर्जन्सी नंबर यापैकी एकाही नंबरवरून तिला प्रतिसाद मिळाला नाही. मुंबईला सुरक्षित शहर म्हटलं जातं, पण प्रत्यक्ष धोक्याच्या वेळी कोणतीही मदत न मिळाल्याचं तिने पोस्टमध्ये नमूद केलं आहे.

**कायदेशीर कारवाईसाठी मदत हवी**

शेवटी तिने नागरिकांना मदतीची विनंती करत लिहिले, "हा विषय पोलिस आणि संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचायला हवा. कायदेशीर कारवाई पुढे कशी न्यावी, याबद्दल मला मार्गदर्शन हवं आहे." सध्या या प्रकरणात अधिकृत तक्रार दाखल झाल्याची माहिती नाही आणि पोलिसांकडूनही कोणतीही प्रतिक्रिया आलेली नाही.

# सांताक्रूझमध्ये फसवणुकीचा मोठा प्रकार
### बनावट पॅनकार्डद्वारे सुरक्षा रक्षकाच्या नावावर कंपनी, ₹.२.२ कोटींची उलाढाल

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील सांताक्रूझमधील एका सुरक्षा रक्षकाच्या पॅनकार्डचा गैरवापर करून तब्बल ₹.२.२ कोटींचे आर्थिक व्यवहार केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वार्षिक उत्पन्न केवळ ३ लाख रुपये असतानाही आयकर नोटिसा मिळू लागल्याने रक्षकाला संशय आला आणि अखेर या बनावट घटनेचा पदार्फाश झाला.

पनवेल येथे राहणारे आणि सांताक्रूझ (पूर्व) येथील कॅरिबियन शिपिंग कंपनीत काम करणारे सुरक्षा रक्षक ऑस्टिन फ्रोज (३१) यांना आयकर विभागाकडून नोटीस आली होती. त्यांचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपये आहे. अशातच, त्यांना २०२०-२१ आणि २०२१-२२ या वर्षांमध्ये त्यांनी कर भरला नाही, असा आरोप त्यांच्यावर करण्यात आला होता.




**नोटीस आली म्हणून...**

ऑस्टिन फ्रोज यांना एप्रिलमध्ये पहिली नोटीस आली होती. त्यावेळी त्यांनी त्या नोटीसला गांभीयार्ने घेतलं नाही. त्यानंतर त्यांना जुलैमध्ये पुन्हा एक नोटीस आली. तेव्हा त्यांच्या पत्नी मारिया यांनी सीए विशाल कोठारी यांना याबाबतची माहिती दिली.तपास केल्यावर असे लक्षात आले की, ही नोटीस खरी आहे. यानंतर हे दाम्पत्य दादर येथील आयकर कार्यालयात गेले. तेथील अधिकाऱ्यांनी सांगितलेली माहिती धक्कादायक होती.

**पॅन क्रमांक सारखाच पण सही मात्र वेगळी**

२०१९ मध्ये ह्यग्राफिकल ट्रेडिंग कंपनीह्ण नावाची कंपनी ऑस्टिन यांच्या पॅनकार्डचा वापर करून नोंदणीकृत करण्यात आली होती. या कंपनीसाठी जीएसटी क्रमांकही काढण्यात आला होता आणि त्याद्वारे तब्बल ₹.२.२ कोटींचे व्यवहार करण्यात आले होते. तपासात असे समोर आले की, कंपनी नोंदणीसाठी वापरलेला पॅन क्रमांक ऑस्टिन यांच्यासारखाच होता; मात्र अर्जावरील फोटो आणि सही पूर्णपणे वेगळी होती.

**वाकोला पोलिसांत गुन्हा दाखल**

या गंभीर गैरवापरानंतर ऑस्टिन फ्रोज यांनी वाकोला पोलिसांकडे तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध आयपीसी कलम ४२० (फसवणूक), ४६७ (महत्त्वपूर्ण कागदपत्रांची बनावट), तसेच इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

# जॉब करण्यासाठी गेली अन् घडलं आक्रीत
### विद्यार्थिनीवर सामूहिक अत्याचार, स्ट्रगलिंग मॉडेलला अटक, २ जण फरार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील अंधेरी परिसरात पार्ट-टाईम जॉब करण्यासाठी गेलेल्या २२ वर्षीय विद्यार्थिनीवर गुंगीचे औषध देऊन सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या सुषमा राव (वय ३१) या स्ट्रगलिंग मॉडेलला अटक करण्यात आली असून तिचे दोन साथीदार फरार आहेत.

**पार्ट-टाईम जॉबच्या बहाण्याने फसवणूक**

पीडित विद्यार्थिनी गरम मसाला उत्पादनांच्या मार्केटिंगसाठी पार्ट-टाईम जॉब करत होती. हे काम सुषमा रावच्या मार्गदर्शनाखाली चालत होते. सुषमाने तरुणीला सांगितले होते की तिचे तात्पुरते कार्यालय अंधेरी पूर्वेतील जेबीनगर येथील एका लॉजमधील भाड्याच्या खोलीत चालू आहे. या ठिकाणी फक्त सुषमा आणि पीडिता दोघीच उपस्थित असत.

**कोल्डड्रिंकमध्ये गुंगीचे औषध**

घटना घडलेल्या दिवशी सुषमाने कामाच्या ठिकाणी पीडितेला कोल्डड्रिंक दिले. त्या पेयात गुंगीकारक औषध मिसळले होते. काही वेळातच विद्यार्थिनी बेशुद्ध पडली. बेशुद्ध अवस्थेचा फायदा घेत सुषमाने तिच्या दोन साथीदारांना लॉजमध्ये बोलावले. या दोघांनी एकामागून एक विद्यार्थिनीवर अत्याचार केल्याचा आरोप पीडितेने केला आहे.

**शुद्ध आल्यावर भयंकर सत्य**

काही वेळानंतर विद्यार्थिनीला शुद्ध येताच तिच्या शेजारी दोन अनोळखी पुरुष बसलेले पाहून ती घाबरली. त्यानंतर सुषमानेच पीडितेला तिचे काढलेले अश्लील फोटो आणि व्हिडिओ दाखवत धमकावले. घाबरून विद्यार्थिनीने कसाबसा तिथून पळ काढला आणि रात्री उशिरा अंधेरी पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दिली.

**पोलिसांचा तपास सुरू**

तक्रार मिळताच परिमंडळ १० चे पोलिस उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली अंधेरी पोलिसांनी तातडीने कारवाई करत सुषमा राव आणि तिच्या साथीदारांविरुद्ध सामूहिक बलात्कार, गुंगीचे औषध देणे, अश्लील व्हिडिओ तयार करणे आणि विनयभंग यांसह गंभीर कलमांतर्गत गुन्हा दाखल केला. सुषमाला अटक करून चौकशी सुरू आहे, तर उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरु आहे. लॉजमधील सीसीटीव्ही फुटेज, कॉल रेकॉर्ड्स आणि इतर तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी फरार आरोपींच्या शोधासाठी विशेष पथके नेमली आहेत.



### विद्यार्थिनींच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह


या प्रकारामुळे अंधेरी परिसरातील नागरिकांमध्ये संताप व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पार्ट-टाईम जॉबच्या नावाखाली विद्यार्थिनींची होणारी फसवणूक हा गंभीर मुद्दा पुन्हा समोर आला आहे.



संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# सिंध भारतात परत येईल का?



पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान रावळपिंडी येथील कारागृहात शिक्षा भोगत आहेत. त्यांची कारागृहात हत्या करण्यात आल्याचे वृत्त 'अफगाण टाइम्स' दैनिकाने प्रसिद्ध केल्यावर कारागृहाबाहेर अजूनही प्रचंड मोठे आंदोलन केले जात आहे. कारागृहाने इम्रान खान यांची प्रकृती उत्तम असल्याचे निवेदन प्रसारित केले असले, तरी त्यांचा व्हिडिओ, छायाचित्र किंवा निवेदन प्रसारित केलेले नसल्याने कारागृह प्रशासनावर कुणीही विश्वास ठेवलेला नाही. इम्रान खान यांच्या बहिणीने त्यांची हत्या झाल्याचा संशय व्यक्त केला आहे. दुसरीकडे गेल्या काही महिन्यांपासून पाकच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात तेहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेने हा प्रांत अफगाणिस्तानचा असल्याचे सांगत तेथे पाकच्या सैन्यावर आक्रमणे चालू ठेवलेली आहेत. बलुचिस्तानमध्ये गेल्या ८० वर्षांपासून पाकपासून स्वतंत्र होण्यासाठी सशस्त्र आंदोलन चालू आहे. त्यातच गेल्या अनेक वर्षांपासून पाकच्या सिंध प्रांतालाही स्वतंत्र सिंधुदेश बनवण्याची मागणी चालूच आहे. त्याला आता भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी 'सिंध परत भारताला मिळू शकते', अशा प्रकारचे विधान केल्याने यावर पुन्हा चर्चा चालू झाली आहे. भारतामध्ये कदाचित राजनाथ सिंह हे पहिलेच संरक्षणमंत्री असतील, ज्यांनी स्वातंत्र्यानंतर सिंधुदेश भारतात आणण्याविषयीचे विधान केले असेल. पाकिस्तानच्या राजकीय वतुर्ळातही अस्वस्थता निर्माण झाली आणि सिंध विधानसभेने या विधानाचा निषेध करणारा ठरावही केला. त्यामुळे पाकच्या परराष्ट्र मंत्रालयाने याला 'भारतातील हिंदुत्वनिष्ठ मानसिकता' म्हटले. पाकला असे म्हणणे आवश्यकच असणार आहे; मात्र सिंध असो, बलुचिस्तान असो किंवा खैबर पख्तूनख्वा असो सर्वांना पाकपासून स्वतंत्र व्हायचे आहे, ही वस्तूस्थिती आहे, हे लक्षात घ्यायला हवे. सिंध हा उपखंडातील असा भूभाग आहे, ज्याचे महत्त्व आजच्या राजकीय सीमांपलीकडे जाते. सिंधु नदीच्या खोऱ्यातील हडप्पा-मोहेनजोदडो ही प्राचीन नगरे हे दाखवतात की, इथली संस्कृती किमान ५ सहस्र वर्षे जुनी आहे. वैदिक साहित्यानुसार सप्त-सिंधु म्हणजे सात नद्यांचा प्रदेश, हीच भारतीय संस्कृतीची जन्मभूमी मानली जाते. इतिहासात सिंध अनेक साम्राज्यांचा भाग राहिला, ज्यात मौर्य, शक, अरब पठाण, मोगल आणि ब्रिटीश यांचा समावेश आहे. सिंधमधील सिंधु नदी भारताची मूळ ओळख आहे. 'हिंदु' हा शब्द 'सिंधु'वरूनच निर्माण झाला, हा इतिहास आहे. सिंधु नदीच्या परिसरात जीवन उभे राहिले; कृषी आणि शहरी संस्कृती जन्मली. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचारांनुसार सिंध म्हणजे हिंदु संस्कृतीची उत्तर सीमेची रेषा ! सावरकरांनी त्यांच्या 'हिंदुत्व' या ग्रंथात अत्यंत स्पष्टपणे म्हटले, 'आसिंधु सिंधुपर्यंतची (सिंधु नदीपासून सिंधु सागरापर्यंतची) ही भूमी पितृभू आणि पुण्यभू आहे.' सावरकरांसाठी सिंध हा केवळ भूभाग नव्हता; तो भारतीय ओळखीचा पाया होता. सिंधु नदी हे हिंदूंच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. सावरकरांची कल्पना भौगोलिक नसून सांस्कृतिक होती. भारताची सीमा नदीने ठरली नव्हती, तर सामूहिक चेतना, इतिहास आणि ओळखी यांनी ठरली होती. पाकमध्ये लोकशाही कधी रूजलीच नाही. नेहमीच सैन्याचा अधिकार राहिलेला आहे आणि आताही सैन्यच देश चालवत आहे. सरकार बुजगावणे आहे. पाकच्या सैन्यात पंजाबचे वर्चस्व आहे. त्यामुळे संपूर्ण पाकवर पंजाबी मुसलमानांचे वर्चस्व असल्याने अन्य प्रांतांना तुच्छ आणि दुय्यम ठरवण्यात आले आहे. त्यांच्याशी सापत्नभावाचा व्यवहार केला गेला आहे आणि चालू आहे. पाकचा सर्वाधिक खर्च पंजाबवर केला जातो. यामुळे अन्य प्रांतांमध्ये असंतोष आणि खदखद आहे. सिंधसाठी आणखी एक कारण म्हणजे सिंधमध्ये मोठ्या प्रमाणात भारतातून गेलेले मुसलमान रहात आहेत. तेथे त्यांना 'मुहाजिर' म्हटले जाते. या मुसलमानांना तेथे तुच्छ लेखले जाते. यातूनच सिंध प्रांतातील लोकांना स्वतंत्र व्हायचे आहे. विशेष म्हणजे पाकमध्ये जे काही हिंदू शेष राहिले आहेत, तेही सिंध प्रांतात सर्वाधिक आहेत. सिंधु नदीचे किंवा उत्तरेकडून येणारे पाणीही पंजाब ७० टक्के प्रमाणात वापरतो आणि सिंधला उर्वरित पाणी सोडतो. त्यामुळे सिंधमधील शेतीची हानी होत आहे. पाकिस्तानची आर्थिक राजधानी कराचीसुद्धा सिंध प्रांतात येते. पाकला येथून ६० टक्के महसूल मिळत असतो, त्या तुलनेत सिंधला त्याचा लाभ मिळत नाही. यामुळे येथे स्वतंत्र सिंधची मागणी होत आली आहे. 'राजनाथ सिंह यांच्या विधानानंतर पुन्हा त्याला उचल मिळू शकते', असे म्हटले जात आहे. इंदिरा गांधी पंतप्रधान असतांना सिंधमधील अशा विचारांचे नेते गांधी यांच्या संपर्कात होते. जर गांधी यांची हत्या झाली नसती, तर कदाचित् सिंध वेगळा होण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र झाले असते. हा प्रश्न अनेकांच्या मनात आहे. भावनेने विचार केला, तर सिंधचे सांस्कृतिक नाते असल्याने त्याला भारताशीच जोडायला हवे, असेच उत्तर असेल; परंतु राजकीय वास्तव वेगळे आहे. सिंध आज पाकिस्तानचा घटनात्मक भाग आहे. तिथे अद्याप स्वतंत्र सिंधुदेशासाठी जनसमर्थन पूर्णपणे प्रभावी नाही. आंतरराष्ट्रीय कायदे आणि भू-राजकीय समीकरणे अशा पालटास अडचणीचे ठरतात. भारत-पाक संबंध आधीच नाजूक आहेत; भूभागीय पालट अवघडच आहे. राजनाथ सिंह यांचे विधान सांस्कृतिक सत्यावर आधारलेले आहे, भू-राजकीय अपेक्षेवर नाही. त्यांनी म्हटले, 'कधी काय होईल सांगता येत नाही.' जर 'कधी काय होईल?', असे म्हटले, तर सिंध भारतात येऊ शकतो किंवा भारताच्या पाठिंब्याने तो स्वतंत्र देश होऊ शकतो. 'स्वतंत्र देश रहाणे सिंधला किती शक्य असू शकणार?', हाही प्रश्नच आहे. त्याला भारताशी जोडणे हाच एकमेव पर्याय असू शकतो. त्यासाठी भारत पुढाकार घेणार आहे का? राजनाथ सिंह यांचे विधान पहाता भारत तसा का विचार करत आहे का? हे ठाऊक नाही. अखंड भारताची मागणी हिंदूंकडून नेहमीच केली जाते; पण अखंड भारत करतांना 'पाक, अफगाणिस्तान येथे असणाऱ्या कोट्यवधी मुसलमानांचे काय करणार?', हा मूळ प्रश्न आहे. पाकमध्ये आताच दिवाळखोरी आहे. अशात तेथील मुसलमानांना भारताला म्हणजे हिंदूंना पोसावे लागेल. त्यातून 'हिंदूंना काय मिळणार?', हेही पहावे लागेल. सध्या जम्मू-काश्मीरवर सर्वाधिक पैसा खर्च केला जातो. त्या बदल्यात हिंदूंना काय मिळते? त्यामुळे सिंधुदेश स्वतंत्र होण्यात पाकचे तुकडे होण्यामुळे आनंद असला, तरी तो भाग भारताला जोडल्याने आनंद होण्याकडे वस्तूनिष्ठ पहावे लागेल.

# वाळूचे कण पळविता कारवाईचा बडगा पडे



राज्यात वाळू तस्करी हा गेल्या अनेक वर्षांपासून शासन आणि प्रशासन यांच्यासमोर उभा असलेला गंभीर प्रश्न आहे. बांधकाम क्षेत्राचा प्रचंड विस्तार, रस्ते आणि पायाभूत सुविधा उभारणीचे व्यापक कामकाज, तसेच नैसर्गिक संसाधनांवरील वाढता दबाव या सर्व गोष्टींमुळे वाळूला अचानक असामान्य व्यावसायिक मूल्य प्राप्त झाले. या मूल्यामुळे वाळू उत्खननात गुंतलेल्या परवानाधारक व्यावसायिकांसोबतच अवैध मार्गाने मोठ्या प्रमाणावर उत्खनन करणार्या टोळ्यांचा उदय झाला. नदीपात्रे रिकामी करत वेगाने पैसा मिळवण्याच्या स्पर्धेत गुन्हेगारी जाळे निर्माण होत गेले आणि शासनाचा महसूल, पर्यावरणीय समतोल आणि कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर परिणाम होऊ लागले. अशा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने वाळू तस्करी रोखण्यासाठी कठोर उपाययोजना स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. राज्यातील महसूल विभागाने जारी केलेल्या नव्या परिपत्रकानुसार अवैध वाळू वाहतुकीसाठी वापरले जाणारे वाहन पहिल्यांदा आढळल्यास त्याचा परवाना तीस दिवसांसाठी निलंबित ठेवण्यात येणार असून वाहन जप्त करण्यात येईल. दुसऱ्या गुन्ह्यात साठ दिवसांची निलंबनाची कारवाई होईल, तर तिर्सया गुन्ह्यात परवाना कायमस्वरूपी रद्द करण्याची तरतूद आहे. हे पाऊल वरवर पाहता कठोर वाटत असले तरी त्याची मुळं राज्यातील वाढत्या अवैध खनिज तस्करीच्या खोल वास्तवात आहेत. एकीकडे शासनाला महसुलाचे मोठे नुकसान होत होते, तर दुसरीकडे नैसर्गिक स्त्रोतांची अक्षरशः लूट सुरू होती.

नदीपात्र खोल झाल्याने भूजलपातळीवर झालेला परिणाम, जलस्रोतांच्या मार्गक्रमणात झालेला बदल, नदीकाठची झाडे आणि जैवविविधता यांचे झालेले नुकसान यामुळे पर्यावरणाची हानी अटळ झाली होती. अवैध खनिज उत्खनन रोखण्याचा प्रयत्न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर झालेल्या हल्ल्यांनी स्थिती अधिकच गंभीर बनवली. शासनाच्या कायद्याला सरळसरळ आव्हान देणारी ही परिस्थिती थांबवण्यासाठी ठोस पावले आवश्यक होती. या निर्णयाचे सकारात्मक परिणाम अनेक पातळ्यांवर दिसू शकतात. सर्वप्रथम, कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद ही स्वतःच प्रतिबंधात्मक प्रभाव निर्माण करते. वाहनाचा परवाना निलंबित होणं म्हणजे त्या वाहनाच्या मालकासाठी आणि ऑपरेटरसाठी मोठा आर्थिक तोटा. बांधकाम किंवा वाहतूक क्षेत्रातील वाहन दिवसेंदिवस रेंगाळले की उत्पन्नाचे सर्व मार्ग थांबतात. त्यामुळे तस्करी करणार्यांच्या मनात कायद्याबद्दल भीती निर्माण होण्याची शक्यता वाढते. दुसरे म्हणजे, महसूल वाढीसाठी अशा कारवाईचा थेट उपयोग होतो. अवैध वाळू उत्खननामुळे शासनाच्या खजिन्यात जाणारे कोट्यवधी रुपये गळतीत निघून जात होते. वैध परवानाधारक व्यावसायिकांचीही आर्थिक स्पर्धा बिघडत होती. अवैध उत्खननावर लगाम बसल्यास परवाना घेऊन निर्धारित मर्यादेत काम करणार्यांचा व्यवसाय सुरक्षित होईल आणि शासनाच्या महसुलातही वाढ होईल. तिसरा आणि सर्वात महत्त्वाचा परिणाम म्हणजे पर्यावरण संरक्षण. नदीपात्रातून अतिरेकाने वाळू काढली गेल्यास नदीचे नैसर्गिक वहनप्रवाह बदलतात. पूरकाळात पाण्याचा मोकळा मार्ग मिळत नसल्यास दोन्ही बाजूंना होणारी गाळसाचणी वाढते. यामुळे पाणलोट क्षेत्रातील पर्यावरणीय साखळी बिघडते. या साखळीवर कृषी, मत्स्यव्यवसाय, स्थानिक पाणीपुरवठा व्यवस्था आणि भूजल यांचे संतुलन अवलंबून असते.

अवैध उत्खननाला चाप बसला तर संपूर्ण परिसंस्था सुरक्षित होईल. सरकारचा हा निर्णय एक पर्यावरणपूरक पाऊल म्हणून निश्चितच स्वागतार्ह आहे, मात्र अशा कठोर धोरणाची अंमलबजावणी करताना अनेक अडचणी उद्भवू शकतात. सर्वप्रथम, वाळू तस्करीच्या विरोधात उभ्या राहणार्या सरकारी कर्मचार्यांना सुरक्षा देण्याची आवश्यकता आहे. पूर्वी अनेक अधिकारी आणि कर्मचारी अवैध वाहतुकीची माहिती गोळा करताना किंवा कारवाई करताना मारहाण, दगडफेक, धमक्या किंवा जीवावर बेतलेले प्रसंग यांना सामोरे गेले आहेत. गुन्हेगारी प्रवृत्तीच्या गटांचा आर्थिक फायदा मोठा असल्याने ते प्रतिकार करतात. अशावेळी कायद्याची भीती आणि प्रशासनाचा अधिकार वास्तविकतेत कार्यान्वित करण्यासाठी पोलीस, महसूल आणि परिवहन विभागांमध्ये समन्वय अत्यंत महत्त्वाचा आहे. तसेच अवैध उत्खनन आणि वाहतूक हे अनेकदा रात्रीच्या अंधारात, दुर्गम भागात किंवा नदीपात्राच्या अनोख्या मार्गाने केले जाते. वाहनांच्या नंबर प्लेट बदलणे, मार्ग बदलणे, नदीतून थेट भार बाहेर काढणे किंवा मोटारीकृत बोटींचा वापर अशा पद्धतींचा वापर करून गुन्हेगार प्रशासनाला चकवा देतात. त्यामुळे तांत्रिक साधनांची आवश्यकता भासते. ड्रोन सर्व्हेलन्स, जीपीएस ट्रॅकिंग, लायसन्स नंबर व्हेरिफिकेशन सिस्टिम, सीसीटीव्ही नेटवर्क यासारख्या तंत्रज्ञानाचा विस्तार न झाल्यास कारवाईची खात्री कमी राहते. तिसरी अडचण म्हणजे भ्रष्टाचाराचे सावट. कोणत्याही कठोर धोरणाच्या यशात प्रशासनातील प्रामाणिकपणा महत्त्वाचा असतो. काही ठिकाणी स्थानिक पातळीवर भ्रष्ट आघाड्या तयार होतात ज्या अवैध उत्खननाला संरक्षण देतात. अशा वेळी धोरण कितीही कठोर असले तरी त्याची अंमलबजावणी कागदापुरतीच राहते. त्यामुळे पारदर्शी आणि जबाबदार यंत्रणा उभारणे हीदेखील मोठी गरज आहे. यासाठी प्रशासनातील तीन प्रमुख विभाग म्हणजे महसूल, पोलीस आणि परिवहन यांच्यात तात्काळ माहिती विनिमयाची एकात्मिक डिजिटल प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. एखादे वाहन वाळू वाहतुकीत अडकले आहे याची माहिती महसूल विभागाने लगेच परिवहन खात्याला कळवणे ही तरतूद आता परिपत्रकात आहेच, परंतु ही माहिती रिअल-टाइममध्ये डिजिटल स्वरूपात दोन मिनिटांत पोहोचणे अधिक उपयुक्त ठरेल. अशा वेळी वाहन तपासणी पथकांना जागेवरच कारवाई करण्याचा अधिकार आणि साधने मिळू शकतात.

# आधी कारभारी, मग टक्केवारी



महाराष्ट्रातल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सुरू असलेला आरक्षण मर्यादेचा घोळ अद्याप मिटलेला नाही. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिलेल्या निकालामुळे राज्य सरकार, निवडणूक आयोग आणि निवडणूक लढवणाऱ्या सर्वच उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. जेव्हापासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० टक्के कमाल मर्यादेचे उल्लंघन झाल्याची याचिका दाखल झाली आहे, तेव्हापासून या निवडणुकांवर टांगती तलवार होती. सर्वोच्च न्यायालय या निवडणुका रद्द करणार, तात्पुरती स्थगिती देणार की निवडणुकांचा कार्यक्रम पुढे ढकलणार असे एक ना अनेक प्रश्न या याचिकेमुळे निर्माण झाले होते. त्यावर घेतलेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने सध्या प्रक्रिया सुरू असलेल्या नगरपरिषद व नगरपंचायतींच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा केला आहे. २८८ पैकी केवळ ५७ नगरपरिषदा व नगरपंचायतींमध्ये आरक्षणाची मयार्दा ५० टक्क्यांच्या वर गेली आहे, अशा ठिकाणचे निकाल जानेवारीत होर्णाया सुनावणीतील अंतिम निकालांवर अवलंबून असतील, अशी एक महत्त्वाची अट सर्वोच्च न्यायालयाने घातली आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने आखलेल्या नियोजित कार्यक्रमानुसार येत्या २ डिसेंबर रोजी या निवडणुकांसाठी मतदान होईल.

याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयात केलेल्या दाव्यानुसार २४२ पैकी ४० नगरपरिषदांमध्ये, ४६ पैकी १७ नगरपंचायतींमध्ये, ३२ पैकी १७ जिल्हा परिषदांमध्ये, ३३६ पैकी ८३ पंचायत समित्यांमध्ये आणि २९ पैकी २ महापालिका क्षेत्रात ५० टक्के आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले आहे. यातील ५७ नगरपरिषदा व नगरपंचायतींचे भवितव्य अंतिम निकालावर ठरणार आहे, म्हणजे या निवडणुकांचा प्रश्नही आता बाजूला पडलेला आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग उर्वरित निवडणुकीची घोषणा करण्यासाठी मोकळे झाले आहे. मात्र, या निवडणुकांची घोषणा करताना निवडणूक आयोगाला ज्या ज्या ठिकाणी ५० टक्क्यांच्या मर्यादेचे उल्लंघन झाले आहे, केवळ अशाच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये पुन्हा एकदा आरक्षणाची बेरीज-वजाबाकी करून सोडती काढाव्या लागतील. तर, ज्या ठिकाणी आरक्षण मर्यादेचे उल्लंघन झाले नाही अशा १७ जिल्हा परिषदा, २५३ पंचायत समित्या आणि २७ महापालिकांच्या निवडणुका घ्यायला काहीच अडचण येणार नाही. एकूणच काय तर जिथे जिथे प्रशासकीय बाबूंनी आकडेवारीत गडबड केली आहे, ती गडबड त्यांना सुधारावी लागेल. त्यासाठी हवे असल्यास एखाद दोन आठवड्याचा अधिकचा वेळ त्यांनी घेतला तरी काही हरकत नाही, परंतु सर्व आकडेमोड करूनच आता निवडणुका व्हायला हव्यात. नव्याने घोषित होणाऱ्या कुठल्याही निवडणुकीत आरक्षण मर्यादेचे उल्लंघन नको, असा दट्टया आधीच सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. हे आदेश नगरविकास, ग्रामविकास खात्याला पाळावेच लागतील, अन्यथा जानेवारीत होणाऱ्या सुनावणीत खैर नसेल. ज्या बांठिया कमिशनच्या अहवालावरून हा सगळा घोळ सुरू झाला, त्या बांठिया अहवालावरही न्यायालयात काथ्याकूट झाला. राज्यात शैक्षणिक व शासकीय नोकरीत इतर मागासवर्गीयांचे (ओबीसी) आरक्षण स्पष्ट असले तरी राजकीय आरक्षणात स्पष्टता नसल्याने हे आरक्षण ठरवण्यासाठी तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने बांठिया कमिशनची स्थापना केली होती. परंतु हा अहवाल येण्याआधीच मविआ सरकार कोसळले आणि बांठिया कमिशनने आपला अहवाल तत्कालीन शिंदे सरकारच्या हाती सुपूर्द केला.

या अहवालात राज्यामध्ये ओबीसींची एकूण संख्या ३७ टक्के असली, तरी जिल्हानिहाय कमी-अधिक बॅकलॉगनुसार त्यांना २७ टक्क्यांपर्यंत राजकीय आरक्षण मिळावे, परंतु हे आरक्षण देताना ५० टक्के कमाल आरक्षणाची मयार्दा ओलांडता कामा नये, असे बांठिया कमिशनने आपल्या अहवालात नमूद केले आहे. या अहवालाला न्यायालयात आव्हान देण्यात आल्याने अद्याप हा अहवालच मुळात लागू झालेला नाही. त्यातही महत्त्वाचे म्हणजे या अहवालाची कायदेशीरता अजूनही सर्वोच्च न्यायालयात सिद्ध व्हायची आहे. असे असूनही राज्य सरकारने या अहवालाच्या आधारे ओबीसींना सरसकट २७ टक्के आरक्षण देण्याचा घेतलेला निर्णय पूर्णतः अनाकलनीय ठरतो. देशात शेवटची जनगणना २०११ साली झाली होती. त्याला जवळपास दीड दशक होत आले. या दीड दशकात ओबीसींसकट इतर जाती-समूहांच्या लोकसंख्येत कमालीची वाढ अथवा घट झालेली असणार. आरक्षण देताना खुद्द सर्वोच्च न्यायालयानेच ट्रिपल टेस्टचे फ्रेमवर्क आखून दिलेले आहे. लोकसंख्येचे असे कुठलेही ताजे आकडे हाती नसताना आरक्षण सोडती काढणेच हवेत तीर मारण्यासारखे आहे. त्यातूनच ओबींना सरसकट दिलेल्या आरक्षणामुळे हा घोळ निर्माण झालेला आहे. खरेतर आज ज्या बांठिया अहवालावर ऐन निवडणुकीच्या तोंडावर इतकी चर्चा होत आहे, त्यावर मागच्या ३ वर्षात राजकीय दरबारी किंवा किमान सर्वोच्च न्यायालयात काहीतरी निर्णय व्हायला हवा होता. हे म्हणजे वरातीमागून घोडे आणण्यासारखे झाले. मागच्या ५ वर्षांहून जास्त काळापासून स्थानिक पातळीवर निवडणुका झालेल्या नाहीत. सर्वच ठिकाणी प्रशासकराज असून प्रचंड भ्रष्टाचार, अनागोंदीचा कारभार सुरू आहे. लोकप्रतिनिधी नसल्याने सर्वसामान्यांना आपले प्रश्न घेऊन जायचे कुणाकडे असा प्रश्न पडला आहे. त्यामुळे तूर्तास बांठिया कमिशनने दिलेल्या अहवालाच्या टक्केवारीत न पडता राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाने ५० टक्क्यांची कमाल मर्यादा पाळून नव्याने आरक्षण सोडती काढव्यात व निवडणुका सुरळीत पार पाडाव्यात. आधी स्थानिक जनतेला कारभारी मिळू द्या, टक्केवारीचा निर्णय सर्वोच्च न्यायालय देईलच.

# 'स्मार्ट इंटेलिजंट व्हिलेज' केवळ कागदावर राहणार का?



पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, खंडित वीज, विद्यार्थ्यांची पायपीट, आरोग्य सेवेचा बोजवारा, रस्त्यांची दुरवस्था या समस्यांनी राज्यातील जनता त्रस्त असताना ७५ गावांना ह्यस्मार्ट इंटेलिजंट व्हिलेजची संकल्पना अंमलात येणार की कागदावरच राहणार, हा प्रश्न आहे.

महाराष्ट्र सरकारने राज्यातील ७५ गावे 'स्मार्ट व इंटेलिजेंट व्हिलेज' म्हणून विकसित करण्याची घोषणा केली आहे. याबाबत शासन निर्णय जारी केला. या प्रकल्पांतर्गत गावांमध्ये वाय-फाय, सीसीटीव्ही कॅमेरे, डिजिटल शिक्षण, ऑनलाइन आरोग्यसेवा, स्मार्ट शेती, महिला आणि बालकल्याण यांसारख्या सुविधा सुरू करणार असल्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे या गावांचा सर्वांगीण विकास करताना ग्रामस्थांचा थेट सहभाग आणि स्थानिक उद्योजकतेला चालना देणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य असणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या घोषणेनुसार हा प्रायोगिक प्रकल्प यशस्वी ठरल्यानंतर राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये १० गावे या योजनेखाली आणण्याचे लक्ष्य असल्याचे राज्य सरकारने स्पष्ट केले आहे. ग्रामीण भाग स्वयंपूर्ण, सशक्त आणि तंत्रज्ञानदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. ग्रामीण भागात 'स्मार्ट' जीवनशैली आणि स्थानिक उद्योजकतेला नवी उभारी देण्यासाठी सरकारचा हा निर्णय ऐतिहासिक ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र आजही महाराष्ट्रातील हजारो गावांमध्ये मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. पिण्याचे शुद्ध पाणी, तासन्तास खंडित होणारी वीज, प्राथमिक आरोग्य केंद्रांची अपुरी उपलब्धता, गावातील रस्त्यांची बिकट अवस्था, सांडपाण्याची निकृष्ट व्यवस्था, शेतकऱ्यांना मिळणाऱ्या यंत्रणांचा अभाव, इंटरनेट कनेक्टिव्हिटीची कमतरता या समस्यांनी आजही गावकरी त्रस्त आहेत. तरी थेट 'स्मार्ट' सिटी या स्तरावर विकास होणार राज्य सरकारचा या दाव्याची खरोखरच अंमलबजावणी होणार का, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

स्मार्ट व्हिलेज संकल्पना गावांच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाची आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रशासकीय पारदर्शकता वाढू शकते, शिक्षण सुधारू शकते, कृषी क्षेत्रात ड्रोन व डिजिटल साधनांचा वापर वाढू शकतो, गावांच्या आर्थिक प्रगतीला मोठी चालना मिळू शकते. पर्यावरणपूरक ऊर्जा, पाणी व्यवस्थापन व कचरा व्यवस्थापन याबाबतीतही सुधारणा घडवणे शक्य आहे.

गावातील तरुणांना रोजगारनिर्मितीचे नवे मार्ग उपलब्ध होतील. त्यामुळे या संकल्पनेचे सकारात्मक परिणाम नाकारता येत नाहीत. तरी सरकारने निवडलेल्या ७५ गावांमध्ये या योजनांची अंमलबजावणी किती काटेकोरपणे आणि सातत्याने केली जाईल? अनेकदा अशा प्रकल्पांमध्ये सुरुवातीला मोठा गाजावाजा केला जातो. निधीची तरतूद केली जाते. पण प्रत्यक्षात अर्धवट कामे, प्रकल्पांच्या अंमलबजावणीत विलंब, गावातील सरपंच-प्रशासनातील समन्वयाचा अभाव यामुळे प्रकल्पाची गुणवत्ता राखली जात नाही.

यापूर्वीही अनेक विकास योजनांची घोषणा करण्यात आली. मात्र प्रत्यक्षात अंमलबजावणी करताना अनेक त्रुटी समोर येतात. त्यामुळे स्मार्ट इंटेलिजंट गाव ही घोषणा प्रत्यक्षात उतरणे काळाची गरज आहे.

राज्याचा विकास होतोय याला कोणीच विरोध करणार नाही. जगातील अनेक देशांनी प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू केली असून भारताची घोडदौड सुरू आहे. भारताच्या विकासात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याची प्रगती होणे तितकेच गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्याची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू आहे. यासाठी राज्य सरकारचा गाडा हाकणारे सत्ताधारी प्रयत्नशील आहेत. मात्र प्रयत्न कागदावर न राहता प्रत्यक्ष साकारणे गरजेचे आहे. गावांचा विकास होणार ही चांगली गोष्ट आहे. मात्र घोषणा न करता राज्यकर्त्यांनी मनापासून अंमलबजावणीसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे, तर अन् तरच महाराष्ट्राचा विकास होईल.

स्मार्ट व्हिलेज हे केवळ इंटरनेट, सीसीटीव्ही किंवा डिजिटल बोर्ड्स लावून पूर्ण होत नाही. गावात रोजगार, गुणवत्ता शिक्षण, सुरक्षितता, पाणी, रस्ते, आरोग्यसेवा आणि न्याय्य प्रशासन या मूलभूत गोष्टी प्रथम उपलब्ध करणे गरजेचे आहे.

स्मार्ट गावे करण्यापूर्वी 'स्मार्ट व्यवस्थापन' आणि 'जबाबदार शासन' गरजेचे आहे. सरकारने जाहीर केलेली ही योजना नक्कीच स्वागतार्ह आहे, पण तिचा जोर जिल्हाधिकारी, पंचायत समिती व ग्रामपंचायतींच्या सक्रिय सहभागावर असेल तेव्हाच ती वास्तवात उतरेल.

### शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार?

राज्यातील ७५ गावे स्मार्ट इंटेलिजेंट करणार असा दावा राज्य सरकारने केला असून त्याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. मात्र राज्यात शेतकऱ्यांचा प्रश्न तितकाच महत्त्वाचा आहे. राज्यात सुमारे ९५ लाखांहून अधिक शेतकरी बांधव आहेत. बळीराजा हा जगाचा पोशिंदा, परंतु याच शेतकऱ्यांचे अनेक प्रश्न आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. यापैकी एक म्हणजे कर्जमाफी. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी समित्या स्थापन केल्या. मात्र या समित्यांचा अहवाल आजही गुलदस्त्यात राहिला आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीच्या अहवालानंतर शेतकरी कर्जमुक्त होईल का, शेतकऱ्यांना कर्जमाफीचा दिलासा मिळणार? हासुद्धा एक प्रश्न आहे.

# कॉर्न फ्रिटर



▮**साहित्य :** मक्याचे दाणे उकडून चेचून, उकडून किसलेला बटाटा, आवडत असल्यास किसलेले चीझ (चेडस चीझ असल्यास उत्तम), मिरपूड, ओरिगनो, बेसिल चुरडून, नसल्यास ड्राय हर्ब्स, किंचित साखर, मीठ, रेड चिली फ्लेक्स. यामध्ये आवडत असेल तर पालक किंवा गाजरही बारीक चिरून अथवा किसून घालता येईल.

▮**कृती :** एका भांड्यात सर्व साहित्य एकत्र करावे. त्याचे चपटे गोळे करावे आणि तव्यावर छान तेलात परतून घ्यावेत. फुटत असतील तर थोडा मैदा, कॉर्नफ्लोअर, ब्रेड कुस्करून घालावा. यामुळे ते मिश्रण मिळून येईल. झाले आपले कॉर्न फ्रिटर तयार.

**प्रसंगानुरूप मनुष्य वेगवेगळ्या प्रकारचे आणि आवश्यकतेनुसार तऱ्हेतऱ्हेचे वस्त्रप्रकार उपयोगात आणत असतो. त्यातलाच एक प्रकार आहे नाइटविअर. हा एक असा प्रकार आहे, जो आपले स्थान केवळ टिकवूनच नाही, तर दिवसेंदिवस अधिकाधिक 'स्टायलिश' होत आहे. ज्या नाइटविअरला आपण अधिक करून गाऊन या एकाच नावाने ओळखत, संबोधत असू तो आज कमालीच्या विविध अवतारांमध्ये दिसतो.**

# तऱ्हेतऱ्हेचे नाइटविअर



**कोणे** एकेकाळी ज्याची सुरुवात झाली असावी, केवळ सोय व आवश्यकता म्हणून. दिवसभराच्या हर तऱ्हेच्या कपड्यांचे ओझे वागवून जीव व देह दोन्हींना जरा आराम मिळावा, यासाठी सुटसुटीत असा हा झोपतानाचा पोशाख म्हणजेच नाइटविअर. हे खरे वाटत नाही ना? तेव्हा या अपेक्षांची पूर्ती करायला रोज वापरून मऊसूत झालेला, अक्षरशः अंगवळणी पडलेल्या एखाद दुसऱ्या रोजच्या ड्रेसने तेव्हा सुरुवात झाली असावी. हळूहळू याच्याकडेही लक्ष दिले जाऊ लागले असावे. त्यामुळेच याला एक विशिष्ट रूप आले. मग त्याची अनेक रूपे झाली. आज ही रूपे शमीस, नाइट ड्रेस कप्तान, गाऊन, मॅक्सी, रँप सेट, टॉप-शॉर्ट्स सेट, बेबी डॉल अशी आहेत.



▮ शमीस हा साधारणतः सिंगल पीस असतो व लांबीला गुडघ्यांच्या थोडासा वर असतो. यातही आता टू-पीस किंवा रँप असा आणखी एक प्रकार आला आहे. ▮ सेट म्हणजेच टी शर्ट-स्लीव्हलेस व पँट थ्री-फोर्थ असा ट्रेंड आहे. टीनएजर्ससाठी टॉप-शॉर्ट सेट विशेष करून आवडीचा होताना दिसतोय. ▮ रंग संगतीबद्दल ही आजकाल प्रत्येक जण 'चुझी' होताना दिसत आहे. नाइटविअरही त्याला अपवाद नाही. पांढरा, क्रीम, लायलॅक, पिंक, रेड, ब्लॅक हे झाले क्लासिक्स, तर नवीन रंगांमध्ये प्लम, परपल, हॉट पिंक, ॲक्वा म्हणजेच हॉट ब्ल्यू. पांढरा, गुलाबी, यलो, ब्राऊन, टरक्वॉइज या रंगांना पसंती आहे. ▮ इतकेच नव्हे तर त्याची डिझाइन, वापरलेले मटेरिअल या गोष्टींकडे ही विशेषत्वाने लक्ष दिले जाते. ब्रायडल आणि डिझायनर नाइटविअरला सुद्धा खूप मागणी आहे यातही पॅटर्नबद्दल बोलायचे झाले, तर पायघोळ, हॉल्टर नेक, योक पिस, शेपली म्हणजेच जास्त घेर नसलेला, फुल, थ्री-फोर्थ हे आहेतच. ▮ शिवाय प्रिंटबद्दल काय विचारायचे. प्लेन, टेक्सचर्ड, एम्ब्रॉयडरी, लाइट आणि ब्राइट प्रिंटेड, ॲबस्ट्रॅक्ट प्रिंटेड हे आहेचत, पण क्लासिक म्हणावे असे हलकेफुलके फ्लोरल व पोल्का डॉट्स आपले वर्चस्व टिकवून आहे. ▮ नाइटविअर म्हणजे दैनंदिन जीवनातील एक अविभाज्य घटक बनलेला आहे.



**केस गळत आहे, टक्कल पडतंय आणि अनेक उपाय करूनही फायदा मिळत नाहीय, तर हे तेल आपल्यासाठी उत्तम पर्याय आहे. याने टक्कल पडलेल्या जागेवरही नवे केस येतील आणि केस दाट होतील. पाहू कसं तयार करायचं हे तेल..**

# या तेलाने उगवतात नवे केस

**हे** तेल तयार करण्यासाठी आपल्याला ५ वस्तूंची गरज आहे ज्या सहजपणे उपलब्ध असतात.

▮ लसणाच्या पाकळ्या : ६ ते ७ ▮ ताजा चिरलेला आवळा : २ ते t ▮ चिरलेला कांदा : १ लहान ▮ एरंडेल तेल : ३ चमचे ▮ नारळाचे तेल : ४ चमचे

या पाचही वस्तू मिसळून आपण तेल तयार करू शकता.



**कृती** - सर्वात आधी एका वाटीत नारळाचे तेल आणि एरंडेल तेल मिसळून घ्या. आता यात कापलेला लसूण, कांदा आणि आवळा टाका. हे मिश्रण मंद आचेवर ५ मिनिटे शिजवून घ्या. आता आचेवरून काढून १ तास हे मिश्रण असंच राहू घ्या. हे तेल नियमितपणे केसांना लावल्याने, केसांचे गळणे कमी होईल आणि गळलेल्या केसांमुळे डोक्यावरील त्वचा दिसायला लागली असेल तर तिथेही नवे केस येतील. याव्यतिरिक्त केसांमध्ये दाटपणा येईल. तर वेळ करू नका, तयार करा आणि या केसांना नवीन जीवन.

**महिला असो किंवा पुरुष आपल्या लठ्ठपणामुळं हैराण असतात. या लठ्ठपणामागे अनेक कारणं असतात. आपलं खाणं-पिणं, राहणं यांचा सतत परिणाम आपल्या लठ्ठपणावर होतो. त्यामुळं आपल्या सौंदर्यावर तर परिणाम होतोच शिवाय आरोग्यही धोक्यात येतं.**

# लठ्ठपणा वाढण्याची सहा कारणे, हे उपाय करा!



**दररोज कार्बोनेटेड ड्रिंक्स पिणं**

जर आपण दररोज सोडा पित असाल तर सावधान, कारण त्याच्या सेवनानं लठ्ठपणा वाढू शकतो. संशोधनकर्त्यांनुसार दररोज सोडा प्यायल्यानं लठ्ठपणा जोमानं वाढतो. तर आठवड्यात एक वेळा सोडा प्यायल्यानं प्रकृतीवर जास्त परिणाम होत नाही. खूप जणांना वाटतं की डायट सोड्यात कमी कॅलरीज असतात. मात्र या कॅलरीजसुद्धा प्रकृतीसाठी हानीकारक असतात. त्यात साखरेचं प्रमाण अधिक असतं म्हणून जेवताना सोडा पिणं टाळावं. जर तुम्हाला जेवताना काही ड्रिंग प्यायचंच असेल तर फळांचा ज्यूस प्या.

**जास्त फॅट्सयुक्त पदार्थ खाल्ल्यानं...**

लठ्ठपणासाठी सर्वात जास्त जबाबदार खाण्या-पिण्याच्या सवयी असतात. जर तुम्ही बेसुमार मिष्ठान्न, तुप, फास्टफूड खात असेल तर लठ्ठपणाला सामोरं जावं लागेल. आपल्या आहारात जास्त फॅट्सयुक्त पदार्थ नसावे, याची काळजी तुम्हालाच घ्यायचीय. कारण त्यात कॅलरीची संख्या खूप कमी असते. त्यामुळं ते टाळल्यानं शरीर स्वस्थ आणि लठ्ठपणा विरहित राहील. जेवणार ऑलिव्ह ऑर्लचा वापर करावा.

**रात्री उशिरा जेवण करणं आणि लगेच झोपणं...**

हे खरंय की जेव्हा आपण झोपता, तेव्हा नॅचरली आपल्या शरीरातून चरबी कमी होते. मात्र पोटभर जेवून झोपल्यानं असं घडू शकत नाही. अनेक जण रात्री खूप उशिरानं जेवतात, ज्यामुळं त्यांना पोटाशी संबंधित अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. सोबतच लठ्ठपणा ही समस्याही निर्माण होते. जर तुम्ही योग्य वेळी जेवणाची सवय लावाल, तर लठ्ठपणा कमी करण्यात मदत होईल. सोबतच रात्री जेवण कमी करावं आणि फळं खावीत. याशिवाय जेवल्यानंतर लगेच झोपू नये. कारण असं केल्यानं जेवण पचत नाही. आपल्या जेवणाऱ्या आणि झोपण्याच्या मध्ये कमीत कमी तीन तासांचं अंतर असावं.

**जेवणासाठी मोठं ताट वापरणं...**

जेव्हा आपण घरी किंवा बाहेर जेवता तेव्हा जेवताना आपल्या ताटाच्या आकाराकडे विशेष लक्ष द्यावं. एका सर्व्हेनुसार जे लोक जेवणासाठी मोठं ताट घेतात, त्यात भरपूर पदार्थ वाढून घेतात. त्यामुळं आपल्या शरीराच्या गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्या जातं. जर तुम्हाला लठ्ठपणा कमी करायचा असेल तर नेहमी छोट्या प्लेटमध्येच जेवा. यामुळे तुम्ही तुमची ओव्हर इटिंगची सवय बंद करू शकाल.


**क्रोध आणि तणावात असताना अधिक जेवणं करणं...**

आपण नेहमी बघितलं असेल की जेव्हा आपल्या खूप क्रोध येतो किंवा आपण तणावात असाल तर तुम्ही जास्त जेवू लागता. त्यावेळी जेवण चांगलं तर लागत नाही मात्र मनाला शांत करण्यासाठी आणि आणखी काही विचार करण्यासाठी तुम्ही खूप जेवता. त्यामुळं हळूहळू चरबी जमा होत जाते. क्रोध आणि तणाव असताना जास्त जेवण करणं टाळायचं असेल तर पाणी प्या. मित्रांसोबत गप्पा मारा आणि आराम करा. त्याशिवाय इतर कोणत्याही ॲक्टिव्हिटी आपण करू शकता. ज्यामुळं तुम्ही भावूक असताना एक्स्ट्रा कॅलरीज घेण्यापासून वाचू शकता.

## व्हॉट्सॲपचे हे फीचर माहितेय का?

# कोणत्याही भाषेत पाठवता येतो मेसेज, पाहा ट्रिक्स

**आजकाल** सगळेच नातेवाईकांशी किंवा मित्रांशी मेसेजवर बोलण्यासाठी व्हॉट्सॲपचा वापरतात. जर तुम्हीही व्हॉट्सॲप युजर असाल तर ही माहिती तुमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. मेटा-मालकीचे इन्स्टंट मेसेजिंग ॲप व्हॉट्सॲप आपल्या युजर्सना बिल्ट-इन ट्रान्सलेशन फीचर ऑफर करत आहे. या फीचरच्या मदतीने तुम्ही तुमचा मेसेज समोरच्या व्यक्तीपर्यंत कोणत्याही भाषेत पोहोचवू शकता. म्हणजेच जर तुम्हाला हिंदी भाषा येत असेल. परंतु तुम्हाला इंग्रजी किंवा इतर कोणतीही भाषा जाणणाऱ्या तुमच्या मित्राशी किंवा ऑफिसमधील सहकाऱ्याशी बोलायचे असेल तर तुम्ही ते सहज करू शकता. भाषांतर फीचर वापरण्यासाठी पाहा ही



स्टेप बाय स्टेप प्रोसेस.

भाषांतर फीचर वापरण्यासाठी तुम्हाला ही प्रोसेस फॉलो करावी लागेल. तुमचे व्हॉट्सॲप चॅट उघडा आणि एक नवीन मेसेज टाइप करा. आता हा टाईप केलेला मेसेज मेनू येतपर्यंत होल्ड करून ठेवा. आता मेनूमधील 'अधिक' पर्याय निवडा. आता भाषांतर पर्याय निवडा. आता तुमच्या समोर एक पॉप-अप विंडो उघडेल ज्यामध्ये तुम्हाला भाषांतरित मेसेज दिसेल. जर तुम्ही पाठवू इच्छित असलेल्या भाषेत मेसेजेसचे भाषांतर केले नसेल, तर युजर्स त्यांना ज्या भाषेत संदेश पाठवायचा आहे ते निवडू शकतात. तसेच व्हॉट्सॲपने एक नवीन फीचर रोल आउट करण्यास सुरुवात केली आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्स स्टेटस अपडेट्समध्ये व्हॉइस नोट्सही शेअर करू शकतील. व्हॉईस स्टेटस अपडेट फीचरची माहिती WA BetaInfo या प्लॅटफॉर्मद्वारे देण्यात आली आहे, जी व्हॉट्सॲप वर येणाऱ्या नवीन फीचर्सचा ट्रॅक ठेवते. WA BetaInfo ने ट्विट करून व्हॉट्सॲपमधील या नवीन फीचरचा स्क्रीनशॉटही शेअर केला आहे. WA BetaInfo नुसार, कंपनी सध्या काही बीटा युजर्ससाठी हे फीचर आणत आहे.

## क्रोकरी करा

# चकाचक

**प्रत्येक** महिलेला वाटते स्वयंपाकघरात काचेची उपकरणे असावीत. क्रोकरीचे आकर्षक प्रकार बाजारात उपलब्ध असल्यामुळे त्याची भुरळ पडल्याशिवाय राहात नाही. डायनिंग टेबलवर स्टायलिश क्रोकरी अधिक शोभून दिसतात. मात्र ही काचेची भांडी बरीच महाग असतात. शिवाय त्यांचा वापर अत्यंत



काळजीपूर्वक करावा लागतो. खबरदारी घेतली नाही तर किती सामानाचे नुकसान होण्याची शक्यता असते.

स्वच्छतेबाबतही क्रोकरीची विशेष काळजी घ्यावी लागते. काचेची चमक टिकून राहण्याचे काही वेगळे मार्ग अवलंबावे लागतात. आज यासंबंधी काही महत्त्वाच्या टिप्स जाणून घेऊ या. क्रोकरीवर डाग राहू नये, असे वाटत असेल तर ती वेळच्या वेळी स्वच्छ करायला हवी. फार काळ अस्वच्छ अवस्थेत ठेवल्यास डाग टिकून राहतात आणि स्वच्छ करणे कठीण होते. काचेची भांडी स्वच्छ करण्यासाठी गार पाण्याऐवजी गरम पाण्याचा वापर करावा. गरम पाण्याचा वापर केल्याने साबणाचा कमीत कमी वापर करून ही भांडी स्वच्छ करणे शक्य होते. गरम पाण्यामुळे भांडी स्वच्छ होतातच, शिवाय त्यावरील जीवजंतूंचाही नायनाट होतो. क्रोकरी स्वच्छ केल्यानंतर काही काळ व्हिनेगर मिसळलेल्या पाण्यात बुडवून ठेवावी. काही वेळाने बाहेर काढून न धुताच भांडी सुकवावी. यामुळे क्रोकरीची चमक टिकून राहते.

# फीट आणि योग्य : बूट हुशारीने निवडा!

**चप्पल आपल्याला संरक्षण देतात आणि ती एक फॅशन ॲक्सेसरीही आहे. अनेकदा चुकीचे फुटवेअर वापरले जातात, तेव्हा त्याचे शरीरावरील परिणाम समजून घेतल्याने आणि योग्य बूट निवडल्याने तुमच्या समस्या सुटू शकतात.**

**हाय हिल्स :**

हाय हिल्समुळे पायाच्या चवड्यांवर अतिरिक्त ताण येतो आणि त्यामुळे वेदना तसेच कॉलोसाइट्सचा त्रास होतो. त्यांच्यामुळे आपले घोटेही मुरगळू शकतात. हाय हिल्सचा दीर्घकाळ वापर केल्यामुळे पोटरीचे स्नायू लहान होऊ शकतात आणि पायात वेदना होतात. ते गुडघे, नितंब आणि मणक्यांवर अतिरिक्त ताण आणतात. त्यामुळे इतर समस्या उद्‌भवू शकतात. नियमित वापरासाठी २ इंचापेक्षा जास्त हिल्स वापरणे टाळा.

**फूटवेअर आणि गुडघ्याचे ऑस्टिओआर्थरायटिस :**

तुम्हाला गुडघ्याच्या वेदना किंवा आर्थरायटिसचा त्रास असल्यास कठीण किंवा टणक बूट आणि हाय हिल्स घालणे टाळा. संशोधनातून असे दिसून आले आहे की, कमी हिल्सचे लवचिक फूटवेअर (०.५ इंच) गुडघ्यांवरील ताण कमी करते.

**फूटवेअर आणि मधुमेह :**

दीर्घकाळ मधुमेह असल्यामुळे नसांचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे पायात बधीरपणा येतो. त्याचा परिणाम म्हणून आपल्याला पायात कापलेले किंवा पुरळ आलेले जाणवत नाही आणि ते वेगाने गंभीर संसर्गात परावर्तित होऊ शकते. पायांची नियमित तपासणी करून लालसरपणा, पुरळ किंवा कापलेले असलेले तपासल्यास आणि खास मऊ फूटवेअरचा वापर केल्यास मधुमेहींमध्ये गंभीर गुंतागुंत टाळता येऊ शकते.



**फीट**

नवीन फूटवेअर खरेदी करताना तुमच्या पायांची लांबी आणि रुंदी मोजून घ्या. कारण, काळानुसार तुमच्या पायांचा आकार बदलू शकतो. तुम्ही पायाचा आकार संध्याकाळी मोजला पाहिजे, कारण दिवस संपताना पाय थोडासा सुजतो. तुमचे अंगठ्याचे बोट आणि बुटाचे टोक यांच्यामध्ये साधारण अर्धा इंच जागा असली पाहिजे. तुमच्या पायाचा सर्वात मोठा भाग बुटामध्ये घट्ट बसला किंवा चिमटला जायला नको. तुमचे बूट पायापेक्षा लहान असल्यास तुमच्या टाचेला त्रास होऊ शकतो. निमुळत्या फूटवेअरमुळे कॉर्न किंवा बुनियन्स होऊ शकतात. बूट खूप मोठे असल्यास घसरल्यामुळे पुरळ आणि वेदना होऊ शकतात.

**योग्य फूटवेअरचा वापर**

**फील :**

तुम्हाला चपलेत आरामदायी वाटले पाहिजे. आरामदायीपणा तपासण्यासाठी स्टोअरमध्ये नवीन चप्पल घालून चाला. तुमचा पाय जमिनीवर आपटतो तेव्हा त्याचा परिणाम कमी करण्यासाठी बुटाला पुरेशा प्रमाणात कुशन असले पाहिजे. लक्षात ठेवा, बूट तुमच्या पायानुसार असावेत, पाय बुटांप्रमाणे जुळवू नका.

**फ्रेमवर्क :**

चौरस किंवा गोल टो-बॉक्स असलेले बूट निवडा. टोकदार टो-बॉक्स असल्यास तुम्हाला कॉर्न, कॅलॉसाइटिस, बुनियन्स, टाचेतील नादुरुस्ती आणि पुरळ यांचा त्रास होऊ शकतो. बुटाची पुढची बाजू तुमच्या पायाच्या पुढच्या बाजूशी जुळती असावी. हील काऊंटर (बुटाची मागची बाजू) इतकी मजबूत असावी की, पाय मुरगळणार नाही आणि तुमच्या घोट्याला सपोर्ट मिळेल.

**बूट बदलण्याची वेळ कधी :**



तुमचे बूट खूप घासलेले असल्यास, तुमच्या घोट्याकडेही घासलेले असल्यास ते घर्षण आणि वापराचे परिणाम किंवा चिन्हे आहेत आणि ती तुमचे बूट बदलण्याची वेळ आहे.



# मधाचे फेसपॅक

**मध हे आपल्या आरोग्यासाठी औषधी आहे. मध हे आपल्या त्वचेवरही गुणकारी असल्याचे सिद्ध झाले आहे. बाजारात आलेले केमिकलयुक्त फेसपॅकमुळे आपल्या त्वचेवर विपरित परिणाम होत असतो. मधाचा फेसपॅक घरच्या घरी तयार करून आपली त्वचेचा सतेजपणा कायम ठेवता येऊ शकतो.**

▮ मुलतानी मातीचे पावडर, गुलाबजल, मध (शहद) व संत्र्याचा रस प्रत्येक एक-एक चमचा घेऊन त्याची पेस्ट तयार करून रात्री झोपण्याआधी चेहऱ्यावर लावावी. १० ते १५ मिनिटांनी चेहरा स्वच्छ करावा.

▮ एक चमचा मधात एका अंड्याच्या बलक घालून चेहऱ्यावर लावावा. १० मिनिटानी चेहरा स्वच्छ करावा.

▮ पिकलेल्या केळीचा गर, कणीक व एक मोठा चमचा मध यांची पेस्ट चेहऱ्यावर लावावी. १० मिनिटांनंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ करावा.

## सतत जांभया येत आहेत का?

# मग त्यामागे असू शकतात ही कारणे

**वारंवार** जांभया येत असतील तर झोप अपुरी झाली असल्याचे हे लक्षण असल्याचे आपण मानतो. मात्र केवळ झोप अपुरी झाली असली तरच सतत जांभया येतात असे नाही. यामागे अन्य काही कारणेही असू शकतात. ही कारणे जाणून घेऊ या. सातत्याने येणाऱ्या जांभया हे मानसिक तणावाचे लक्षण असू शकते. मानसिक तणाव जास्त असेल, तर त्याचा परिणाम मेंदूच्या सक्रियतेवरही होत असतो. त्यामुळे मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी प्राणवायूचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी वारंवार जांभया येऊ लागतात. मेंदूला प्राणवायूचा पुरवठा कमी होत असेल तर याचा परिणाम फुफ्फुसांच्या कार्यावरही होतो. यादरम्यान फुफ्फुसांमध्ये प्राणवायूची मात्रा कमी होऊन कार्बन डाय ऑक्साईडचे प्रमाण वाढले, तर हा वायू कमी करून प्राणवायूची पातळी वाढवण्यासाठी देखील आपल्याला जांभई येते. जांभई आल्याने मेंदूमधील प्राणवायूचा पुरवठा झपाट्याने वाढतो आणि फुफ्फुसांमध्ये साठून राहिलेला कार्बन डाय ऑक्साईड बाहेर पडण्यास मदत होते.




## पाठदुखी, कंबरदुखीने हैराण?

# मग जमिनीवर झोपून पहा

**आजकाल** तरुण वर्गातही पाठदुखी, कंबरदुखी, मणक्याच्या वेदना, श्वास घेण्यास त्रास असे विकार वाढत चालले आहेत. सुखासीन जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव ही कारणे त्यामागे आहेत तसेच रोजच्या आयुष्यात वाढलेले ताणतणाव ही त्याला हातभार लावत आहेत. आपल्या वापरत असलेल्या मऊ मुलायम गाद्या हे विकार अधिक वाढवतात असे निरीक्षण नोंदवले गेले आहे.

मऊ गाद्या, उशा सुखद वाटल्या तरी पाठीची दुखणी, स्वास्थ्यासाठी त्या चांगल्या नाहीत असे तज्ज्ञ सांगतात. मणक्याचे विकार दूर ठेवायचे असतील तर जमिनीवर सतरंजी अथवा पातळ चटई टाकून त्यावर जमिनीला पाठ लावून झोपणे खूपच उपयुक्त ठरते. अशा विश्रांतीचे अनेक फायदे होतात.



पहिले म्हणजे जमिनीला पाठ लावून झोपण्याने पाठीचा कणा योग्य स्थितीत राहतो. उशी न घेता झोपले तर श्वास घेण्यास होत असलेला त्रास दूर होतो. एखाद्या रात्री झोप येत नसेल तर अशा प्रकारे जमिनीवर झोपून पहा, शांत झोप येते. खांदे, कुल्ले या ठिकाणी वेदना होत असतील तर जमिनीवर झोपण्याने त्या हळूहळू कमी होत जातात. पाठदुखीचा त्रास कमी होतो. गादीवर झोपल्याने शरीराचे तापमान वाढते, त्यामुळे शरीरात उष्णता वाढते. चटई अथवा सतरंजी घालून जमिनीवर झोपल्यास हा त्रास होत नाही, शिवाय रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू शांत राहतो. स्नायूंना आराम मिळतो. रोज जमिनीवर झोपणे शक्य नसेल तर जेव्हा जेव्हा पाठदुखी, कंबरदुखी व वरील कोणते त्रास होतात तेव्हा काही दिवस तरी जमिनीवर झोपावे, असे सांगितले जाते.

# दिलासाही अन् टांगती तलवार

## स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यास सुप्रीम कोर्टाचा हिरवा कंदील

**टांगती तलवार**

ओबीसी आरक्षणाची मयार्दा ओलांडण्याचे प्रकरण हे तीन सदस्यीय घटनापीठाकडे वर्ग करण्यात येणार आहे. त्यामुळे भविष्यात या उमेदवारांवर टांगती तलवार असणार आहे. जानेवारीत ३ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर हे प्रकरण सूचीबद्ध करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. जिल्हा परिषद, महापालिकेच्या निवडणुका अधिसूचित वेळापत्रकानुसार घेतल्या जाऊ शकतात. पण ५७ ठिकाणाचे आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त झाले आहे, त्याचे निकाल या खटल्यांच्या अंतिम निकालाच्या अधीन राहतील. जिल्हा परिषद, पंचायत समिती, मनपाची निवडणूक प्रक्रिया राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोग सुरू करू शकतो. या संस्थांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांपेक्षा जास्त होता कामा नये, ही अटही या खटल्यांच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**सुप्रीम कोर्टात काय झाले?**

- नगरपरिषदा, नगरपंचायत निवडणुका वेळापत्रकानुसार
- आरक्षण मयार्दा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन
- पुढील सुनावणी २१ जानेवारी रोजी खंडपीठासमोर
- जिल्हा परिषदा, महापालिकांच्या निवडणुकीत आरक्षण मयार्दा पाळणे बंधनकारक

**राज्य निवडणूक आयोगाची कबुली**

राज्यातील ४० नगरपरिषदा आणि १७ नगरपंचायतींमध्ये ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडली गेल्याची कबुली राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिली होती. त्यानंतर शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयात महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित सुनावणी पार पडली. बांठिया आयोगाचा अहवाल आम्हीही वाचला नाही, पण सध्या त्यालाच आधार मानले आहे. मनपा, जिल्हा परिषदा, पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण नको, असेही सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. आरक्षणाच्या ५० टक्के मयार्देबाबत महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाशी सल्लामसलत सुरू असल्याची माहिती राज्य सरकारकडून सर्वोच्च न्यायालयात देण्यात आली होती. त्यासाठी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडून अतिरिक्त वेळही मागितला होता.



■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची प्रक्रिया आहे तशी सुरू ठेवण्यास सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी हिरवा कंदील दर्शवला. मात्र, त्याचवेळी ज्या ठिकाणी आरक्षणाची ५० टक्क्यांची कमाल मर्यादा ओलांडली गेली आहे, तेथील निकाल न्यायालयाच्या अंतिम निकालाच्या अधीन राहतील, असेही सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले. यामुळे या जागांवर निवडून येणाऱ्या उमेदवारांवर पद जाण्याची टांगती तलवार कायम राहणार आहे. कोर्ट याप्रकरणी २१ जानेवारीला पुढील सुनावणी घेणार आहे.

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग शुक्रवारी अखेर मोकळा झाला. सर्वोच्च न्यायालयाने निवडणुकांना स्थगिती दिली नसल्याने २८८ नगर परिषदा आणि नगर पंचायतींच्या निवडणुका घोषित वेळापत्रकाप्रमाणेच होणार आहेत. मात्र ५० टक्के आरक्षणाची मयार्दा ओलांडलेल्या निवडणुका आदेशाधीन राहतील, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. तर आरक्षणाची मयार्दा ओलांडल्याच्या आक्षेपावरील सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने हे प्रकरण तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाकडे सुनावणीसाठी पाठवण्याचा निर्णय घेतला आहे.

**आरक्षण मर्यादा पाळा**

जानेवारीमध्ये पुढील सुनावणीवेळी जो अंतिम निर्णय येईल तो निर्णय आरक्षणाचे उल्लंघन झालेल्या ठिकाणी बंधनकराक असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. आता निवडणुका अंतिम टप्प्यात असल्याने त्या थांबवणे योग्य नसल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. तसेच जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणुकीबाबत पुढील निर्णय घेण्यासही न्यायालयाने परवानगी दिली आहे. मात्र, त्यावेळी आरक्षणाची मर्यादा पाळण्याचे निर्देशही न्यायालयाने दिले आहेत.

**'या' निवडणुका अधिसूचित नाहीत**

सरन्यायाधीश सूर्य कांत आणि न्या. जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत सुनावणी झाली. राज्य निवडणूक आयोगाने कळवले की, २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुका २ डिसेंबर रोजी आधीच अधिसूचित करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदा, महानगरपालिका आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका अद्याप अधिसूचित झालेल्या नाहीत.

# अधिवेशनातील निवेदनांची तातडीने कार्यवाही करा!

## राज्य सरकारची नवी नियमावली जारी


■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनात मुख्यमंत्री व मंत्र्यांकडून अधिवेशन काळात कुठलाही मुद्दा उपस्थित केला जातो. तसेच सभागृहाच्या पटलावर निवेदन व माहिती सादर केली जाते. मुख्यमंत्री व मंत्र्यांकडून बैठकीचे आश्वासन दिले जाते. अशा वेळी मंत्रालयातील संबंधित विभागातील अधिकारी यांनी आदेशाची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी, अन्यथा संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत. याबाबत शुक्रवारी शासन निर्णय जारी केला आहे.

नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाला ८ डिसेंबरपासून सुरुवात होत आहे. या अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर शासनाने सर्व विभागांना कठोर सूचना जारी केल्या असून, अधिवेशनातील कामकाज अत्यंत गांभीयार्ने हाताळण्याचे आदेश दिले आहेत. संसदीय कार्य विभागाचे सचिव सतीश वाघुले यांनी हे परिपत्रक जारी केले आहे.

या परिपत्रकानुसार, विभागांनी तारांकित आणि अतारांकित प्रश्नांची उत्तरे क्यूआयएस प्रणालीद्वारे वेळेत व परिपूर्ण स्वरूपात सादर करणे बंधनकारक आहे. खुलाशासाठी पाठविलेल्या सूचनांची माहिती तीन दिवसांत विधानमंडळ सचिवालयाकडे पाठवणे आवश्यक असून, अधिवेशनादरम्यान आलेल्या लक्षवेधी सूचनांवरील निवेदने अधिवेशन संपण्यापूर्वी अनिवार्यपणे सादर करावीत.

या अधिवेशनात गॅलरीत आणि मंत्रालयात संबंधित अधिकारी सतत उपस्थित राहून सभागृहातील



**मुख्यमंत्री कार्यालयात टिप्पणी पाठवावी**

सरकारी विधेयकांवरील चर्चेसाठी मंत्री आणि राज्यमंत्री यांनी समाधानकारक उत्तरे देणे अपेक्षित आहे. यासाठी प्रत्येक विधेयकासंबंधी स्वयंस्पष्ट टिप्पणी सचिवांकडून तयार करून मुख्यमंत्री कार्यालयास पाठवावी, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

मुद्द्यांवर होणाऱ्या चर्चेची नोंद ठेवणे आवश्यक आहे. अधिवेशन कालावधीत मंत्री तसेच विभागीय अधिकारी सभागृहात उपस्थित राहतील याची दक्षता विभागांनी घ्यावी, असा ठोस आदेश देण्यात आला आहे. विधिमंडळ सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे सुसंगत, सर्वसमावेशक असावीत व विहित मुदतीत विधानमंडळ सचिवालयाकडे पाठविणे अनिवार्य आहे.

राज्याच्या अधिवेशन काळात अनेक महत्त्वाचे प्रश्न लोकप्रतिनिधी यांच्याकडून मांडली जातात. या प्रश्नांची सोडवणूक तत्काळ होण्यासाठी सरकारने उपाययोजना केल्या आहेत.

# प्रदूषण रोखण्यासाठी बांधकाम प्रकल्पांवर कठोर नियंत्रण ठेवा... उच्च न्यायालयाचे सक्त आदेश

■**मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील वाढत्या प्रदूषणाची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने शुक्रवारी राज्य सरकार आणि बृहन्मुंबई महापालिका प्रशासनाला सक्त आदेश दिले. प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी कठोर नियंत्रण ठेवा, तेथे मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याची खबरदारी घ्या, असे निर्देश न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठाने दिले. तसेच प्रदूषण नियंत्रणाच्या उपाययोजनांसाठी तातडीने पाच सदस्यीय स्वतंत्र समिती स्थापन करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले.

दिल्लीपाठोपाठ मुंबईतील प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरात ५०० मीटरच्या पुढे दिसेनासे झाले आहे, असे निरीक्षण नोंदवत उच्च न्यायालयाने गुरुवारी चिंता व्यक्त केली होती. त्याचवेळी राज्य सरकार आणि बृहन्मुंबई महापालिकेला भूमिका स्पष्ट करण्यासाठी एक दिवसाचा वेळ दिला होता. त्यानुसार

- मुंबईतील वायू प्रदूषण रोखण्यासाठी बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी उपाययोजनांची सक्ती अनिवार्य करा.
- ह्यएक्यूआयह्न सुधारेपर्यंत लोकांना रेल्वे स्थानक, गदीर्ची ठिकाणे आणि इतर सार्वजनिक ठिकाणी मास्क देण्याबाबत विचार करावा, अशी सूचना न्यायालयाने केली.
- मुंबईत बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी प्रदूषण दर्शक यंत्रणा, धूळ बाहेर उडू नये यासाठी उंच पत्रे उभारणे केवळ बंधनकारक करून भागणार नाही, तर त्यांची अंमलबजावणी होतेय की नाही?, याची वेळोवेळी तपासणी करणे गरजेचे आहे.



शुक्रवारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

यावेळी खंडपीठाने तातडीने प्रदूषण नियंत्रणासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. मुंबईतील खराब हवेच्या गुणवत्तेवर नियंत्रण मिळविण्यासाठी वेळ लागेल, परंतु मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन केल्यास बांधकामांमुळे होणारे प्रदूषण नियंत्रित केले जाऊ शकते, असे खंडपीठाने स्पष्ट केले. त्याच अनुषंगाने शहर आणि उपनगरांतील बांधकाम स्थळांची तपासणी करण्यासाठी पाच सदस्यांची स्वतंत्र समिती स्थापन केली.

या समितीमध्ये बृहन्मुंबई महापालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांचा समावेश असणार आहे. बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी प्रदूषण नियंत्रण उपायांचे काटेकोर पालन केले जात आहेत की नाही, याची पडताळणी समितीमार्फत केली जाणार आहे. मुंबईतील खराब हवेच्या प्रश्नाकडे लक्ष वेधणाऱ्या विविध याचिकांवर मुख्य न्यायमूर्तींच्या खंडपीठापुढे ही सुनावणी झाली. २०२३ पासून मुंबईच्या हवेचा गुणवत्ता निदेर्शांक सातत्याने खालावत चालला आहे, असा युक्तिवाद याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी केला. त्याची दखल घेत न्यायालयाने पालिका आणि राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाला १५ डिसेंबरपर्यंत प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी मागील वर्षात केलेल्या कृतींचा तपशीलवार अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

# एसटीच्या नव्या बसगाड्यांवर चालकांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने

## कंत्राटी भरती प्रक्रियेचा राज्य सरकारने फेरविचार करण्याची मागणी

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य सरकार एसटीला स्वमालकीच्या ८ हजार नवीन गाड्या खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करून देणार असून याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. हा निर्णय प्रवाशांच्या दृष्टीने अत्यंत चांगला व दिलासा देणारा असला तरी त्याला लागणारे चालक मात्र कायमस्वरूपी देण्यास सरकारने असमर्थता दर्शविली असून या गाड्यांवर कंत्राटी पद्धतीने चालक नेमले जाणार आहेत. याचा दूरगामी परिणाम एसटीच्या भवितव्यावर होणार असल्याने कंत्राटी पद्धतीने करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेबाबत फेरविचार करावा, अशी मागणी महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने केली आहे.



एसटीच्या ताफ्यात येत्या सहा महिन्यात नवीन ८००० गाड्या येणार आहेत. प्रवाशांच्या दृष्टीचे हा अत्यंत चांगला व महत्त्वाचा निर्णय ठरणार आहे. बऱ्याच वर्षांनी एसटीच्या ताफ्यात मोठ्या प्रमाणावर गाड्या येत असल्याने अनधिकृत खासगी वाहतुकीला मोठ्या प्रमाणात आळा बसेल अशी शक्यता सुद्धा वर्तवली जात आहे. मात्र या गाड्यांवर कंत्राटी पद्धतीने चालक नेमले जाणार आहेत. हे कंत्राट तीन वर्षांसाठी असून गाड्यांचे आयुर्मान मात्र १५ वर्ष असणार आहे. याशिवाय निर्धारित १५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर व किलोमीटर संपल्यावर या गाड्या एलएनजीमध्ये रूपांतरित होणार आहेत.

एसटी चालविण्यासाठी तीन वर्षांनी चालक मिळणे मुश्कील होऊ शकते. त्यामुळे कंत्राटी पद्धतीने चालक नेमल्यास भविष्यात महामंडळाला अनेक संकटांना सामोरे जावे लागणार असल्याचा दावा या क्षेत्रातील जाणकार करीत असून राज्य सरकारने एसटीला कायमस्वरूपी चालक भरती करण्यास मंजुरी दिली, तर कायमस्वरूपी रोजगारनिर्मिती होईल व त्यातून अनेक प्रश्न सुटतील, असे महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी म्हटले आहे.

# कार्यकारी अभियंत्यासह महिला अभियंता लाचप्रकरणी अटकेत

■**कराड। प्रतिनिधी,**

जलसंपदा विभागाच्या ओगलेवाडी (ता. कराड) येथील टेंभू उपसा सिंचन योजनेच्या कार्यालयात सुरक्षारक्षकांच्या बिलाला मंजुरी देण्यासाठी लाचेची मागणी करणाऱ्या कार्यकारी अभियंत्यासह कनिष्ठ महिला अभियंत्याला सातारा लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाने शुक्रवारी सायंकाळी रंगेहात पकडले. कार्यकारी अभियंता आनंद रामदास काळमेघ (रा. सिल्वर ओक बिल्डिंग, विद्यानगर, कराड) आणि कनिष्ठ अभियंता माधुरी साई देवरे (रा. सिल्वर गार्डन अपार्टमेंट, बनवडी फाटा, कराड) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. तक्रारदाराने सातारा लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडे दिलेल्या तक्रारीनुसार, टेंभू उपसा योजनेच्या ओगलेवाडी कार्यालयात एका सिक्युरिटी एजन्सीमार्फत प्रतिदिन ६१० रुपयांप्रमाणे तीन सुरक्षारक्षक पुरवले होते. त्यांच्या सेवेचे ५,९४,७२० रुपये मूल्य असलेले बिल कराड कार्यालयातून पुणे येथील कृष्णा खोरे विकास महामंडळाकडे पाठवले गेले व ते मंजूर झाले. या मंजुरीनंतर १२ नोव्हेंबर २०२५ रोजी तक्रारदाराला ४,६६,९६० रुपये मिळाले. यानंतर कनिष्ठ अभियंता माधुरी देवरे यांनी बिलाच्या ३ टक्के प्रमाणे १७ हजार रुपयांची लाच मागितली. तसेच कार्यकारी अभियंता काळमेघ यांना भेटावे, असा सल्ला दिला. तक्रारदाराने काळमेघ यांची भेट घेतली असता त्यांनी ३० हजार रुपये लाच मागितली. तडजोडीनंतर त्यांनी २५ हजार रुपये देणे भाग आहे, असे सांगितले. तक्रारदाराने सातारा लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधल्यानंतर विभागाने शुक्रवारी सायंकाळी सापळा रचला. या कारवाईत आनंद काळमेघला २५,००० रुपये तसेच माधुरी देवरेला १७,००० रुपये स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. रात्री उशिरा कराड शहर पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

# उल्हासनगरात गोळीबार प्रकरणी तिघांना अटक

■**उल्हासनगर। प्रतिनिधी,**

उल्हासनगरात २१ नोव्हेंबर रोजी कॅम्प नंबर ३ येथील इम्लीपाडा परिसरात जुन्या वैमनस्यातून गोळीबार करणाऱ्या तीन आरोपींना पोलिसांनी अटक करून तुरुंगात टाकले आहे. यातील एका फरार आरोपींचा जोरदार शोध सुरू आहे. या हिंसक घटनेमुळे शहरात दहशतीचे वातावरण पसरले होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २१ नोव्हेंबर रोजी रात्री ११:३० वाजता फालवर लाईनसच्या इम्ली पाडा परिसरातील गोगाजी मंदिराजवळ सचिन उर्फ बाउजी करोतिया त्याच्या मित्रांसह रस्त्याच्या कडेला उभा होता. अचानक मोहित हिंदुजा आणि त्याचे इतर साथीदार आले आणि त्यांना घेरले. व पोलिसात दाखल एका गुन्हा प्रकरणा वरून झालेल्या वादाचा वचपा काढण्यासाठी हल्लेखोरांनी शिवीगाळ करताना पिस्तूल काढून सचिन करोतियावर थेट गोळीबार केला. दोन्ही गोळ्या बाजूने गेल्याने मोठा अनर्थ टळला आणि सचिन थोडक्यात बचावला. या घटनेनंतर, सचिन करोतिया यांनी मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून, पोलिसांनी मोहित हिंदुजा आणि त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध खून करण्याचा प्रयत्न, शस्त्र बाळगणे आणि इतर गंभीर आरोपांखाली गुन्हा दाखल केला होता पोलिसांनी त्याला शोधण्यासाठी मोठी मोहीम सुरू केली होती दरम्यान, खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी मोहित हिंदुजा, कृष्णा राजपूत, धीरज परवानी यांना सापळा रचून अटक केली आणि त्यांच्या एका साथीदाराचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणामुळे उल्हासनगरमध्ये पुन्हा एकदा बेकायदेशीर शस्त्रांची संख्या आणि टोळीच्या मोठ्या प्रमाणात उपस्थितीबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

# गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व उलगडणार

## प्रतापगड-शिवनेरी किल्ल्यांवर नमो पर्यटन माहिती केंद्र

**राज ठाकरेंच्या भूमिकेकडे लक्ष!**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नमो पर्यटन केंद्र उभारण्यास कडक विरोध दर्शवला आहे, ₹किल्ल्यावर किंवा परिसरात असे केंद्र उभारले तर फोडून टाकू,₹ असा इशारा दिला आहे. विरोधकांनीही छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव का दिले नाही, असा सवाल उपस्थित केला आहे. दरम्यान, सरकारने 'नमो' नावाबाबतची भूमिका अद्याप स्पष्ट केलेली नाही. मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे आता याबाबत काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

■**मुंबई। प्रतिनिधी,**

गडकिल्ल्यांचा इतिहास राज्यातील विशेष करून तरुण पिढी उलगडावा यासाठी गडकिल्ल्यांवर नमो पर्यटन माहिती केंद्र उभारण्यात येणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून गडकिल्ल्यांचे ऐतिहासिक महत्त्व, किल्ल्यांवर झालेल्या लढाया, किल्ल्यांचा पराक्रम याचा उलगडा होणार आहे. गडकिल्ल्यांचे संवर्धन व संरक्षण करण्यासह पर्यटनाला चालना मिळावी यासाठी पर्यटन मंत्री शंभूराजे देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली नमो पर्यटन माहिती केंद्र उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील यांनी सांगितले.

असल्याचे बी. एन. पाटील म्हणाले. प्रतापगड, रायगड, शिवनेरी आणि साल्हेर या किल्ल्यांवर नमो पर्यटन माहिती केंद्र उभारण्यात येणार असून प्रतापगड, शिवनेरी किल्ल्यावर केंद्र उभारणीसाठी निविदा प्रक्रिया राबवण्यात राज्यातील पर्यटनक्षेत्राला नवी गती देण्यासाठी राज्य सरकारकडून मोठी पावले उचलली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पर्यटन विभागाच्या वतीने प्रतापगड, रायगड, शिवनेरी आणि साल्हेर या चार ऐतिहासिक किल्ल्यांच्या परिसरात 'नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्रे' उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य सरकारच्या पर्यटन विभागाने प्रतापगड आणि शिवनेरी किल्ल्यांसाठी निविदा प्रक्रिया सुरु केली असून, उर्वरित रायगड व साल्हेर किल्ल्यांसाठी पुढील दोन दिवसांत निविदा काढण्यात येणार असल्याचे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी राज्यभर ७५ 'नमो पर्यटन माहिती सुविधा केंद्रे' उभारण्याची घोषणा केली आहे. त्याच्या पहिल्या टप्प्यात या चार किल्ल्यांभोवती केंद्रे उभारण्यासाठी ५० कोटी रुपयांचा निधी राखून ठेवण्यात आला असून, त्यामुळे गडकोट पर्यटनाला नवसंजीवनी मिळणार आहे. पर्यटकांना ऐतिहासिक स्थळांपर्यंत आरामदायी पद्धतीने पोहोचण्यासाठी मार्गदर्शन, सुविधा आणि माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# दिव्यांग अपमानप्रकरणी पालिकेचा माफीनामा

■**उल्हासनगर। प्रतिनिधी,**

उल्हासनगर महापालिकेच्या प्रवेशद्वारावर दिव्यांग बांधवांना थांबवून अपमानास्पद वागणूक देण्यात आल्याच्या धक्कादायक प्रकरणाने शहरात संतापाची लाट उसळली होती. मानवाधिकार व दिव्यांग कायदा २०१६ चा भंग करणाऱ्या या वागणुकीविरोधात प्रहार जनशक्ती पक्ष व दिव्यांग क्रांती संघटनेने माजी मंत्री बच्चू कडू यांच्या आदेशानुसार ठाणे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्नील पाटील यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेसमोर तीव्र आंदोलन छेडले. या दबावामुळे अखेर महापालिका प्रशासन नरमले असून संबंधित सुरक्षा कर्मचाऱ्याने दिलगिरी व्यक्त केल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले. तरीही ''दिव्यांगांचा अवमान सहन नाही'' असा ठाम संदेश या आंदोलनातून शहरभर पसरला.



२६ नोव्हेंबर रोजी महापालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर सुरक्षारक्षकांनी दिव्यांगांना आत येण्यास अडवून अपमानास्पद भाषा वापरल्याचा प्रकार समोर आला होता. या धक्कादायक कृत्याबद्दल संबंधित रक्षकाविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड. स्वप्नील पाटील यांनी तत्काळ केली.

दिव्यांग बांधवांच्या मानवी हक्कांवर गदा आणणाऱ्या या वर्तनाने दिव्यांग कायदा २०१६ चा थेट भंग झाल्याचा आरोप करण्यात आला. घटनेच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्ष आणि दिव्यांग क्रांती संघटनेने महापालिकेसमोर जोरदार आंदोलन उभारले. आंदोलनकर्त्यांनी, ''संबंधित सुरक्षारक्षकावर तत्काळ गुन्हा दाखल झाला पाहिजे,'' अशी ठाम भूमिका घेतली.

आंदोलनादरम्यान महापालिकेच्या उपायुक्त स्नेहा कर्पे यांनी प्रतिनिधींशी चर्चा केली. या बैठकीत महापालिका प्रशासनाने संबंधित प्रकाराचा निषेध व्यक्त करत भविष्यात अशा घटना होऊ नयेत यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले. तसेच संबंधित सुरक्षा कर्मचाऱ्याने आपली चूक मान्य करून अधिकृतरीत्या माफी मागितली. प्रशासनाच्या या दिलगिरीनंतर आणि सुधारात्मक कार्यवाहीच्या हमीवर आंदोलन मागे घेतले गेले.

या बैठकीत दिव्यांगांसाठी उपलब्ध विविध सरकारी योजनांवर चर्चा झाली. महापालिकेच्या सर्व सेवांमध्ये दिव्यांगांसाठी प्राधान्य, सुलभता आणि विशेष सुविधा उपलब्ध करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा करण्याची मागणीही पुढे आली. या संपूर्ण प्रकरणातून दिव्यांग बांधवांचा सन्मान हा पुन्हा एकदा केंद्रस्थानी मुद्दा ठरला असून ''दिव्यांगांवर अन्याय सहन केला जाणार नाही'' असा ठाम संदेश समाज व प्रशासन या दोन्ही स्तरांवर स्पष्टपणे पोहोचला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com